(KHUTBAT : Part 5 - Haj)

प्रवचने

भाग - ५

हज

लेखक

मौ. सय्यद अबुल आला मौदूदी

भाषांतर

प्रो. मुबारक हुसेन मनियार

हज

हज

इस्लामी बंधुनो! मागील प्रवचनात नमाज, रोजा व जकातसंबंधी आपल्याला तपशीलवार मी सांगितले आहे की या उपासना कशाप्रकारे माणसाच्या जीवनाला इस्लामच्या साच्यात आकार देतात. आणि त्याला अल्लाहच्या गुलामीसाठी तयार करतात. आता इस्लामच्या फर्ज (अनिवार्य) उपासनांपैकी केवळ हज (यात्रा) उरली आहे की जिचे फायदे मला आपणास सांगावयाचे आहेत.

हजचा अर्थ

अरबी भाषेत हजचा अर्थ दर्शन करण्याचा निश्चय करणे होय. ज्याअर्थी हजसाठी सर्व दिशेने लोक काबाच्या दर्शनाचा निश्चय करून निघतात त्याअर्थी याचे नाव हज ठेवले गेले.

हजचा प्रारंभ

सर्वप्रथम याचा प्रारंभ ज्या तऱ्हेने झाला त्याची कथा धडा घेण्याजोगी आहे. ही कथा लक्षपूर्वक ऐका जेणेकरून हजची वास्तविकता चांगल्या प्रकारे आपल्या लक्षात राहील व हज यात्रेचे लाभ समजून घेणे आपल्याला सोपे जाईल.

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या काळातील स्थिती

असा कोण मुसलमान, ईसाई (ख्रिश्चन) अथवा यहूदी (ज्यू) असेल जो

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या नावाने परिचित नसेल? जगातील दोन तृतीयांशपेक्षा अधिक लोकसंख्या त्यांना नेता मानते. हजरत मूसा (अ.), हजरत ईसा (अ.) आणि हजरत मुहम्मद (स.) तिघे त्यांच्या संततीपैकी आहेत. त्यांनीच प्रज्वलित केलेल्या दीपकामुळे जगभरात मार्गदर्शनाचा प्रकाश पसरलेला आहे. चार हजार वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला की जेव्हां इराकच्या भूमीवर त्यांचा जन्म झाला होता. त्यावेळी संपूर्ण जगाला अल्लाहचे विस्मरण झाले होते. पृथ्वीतलावर एखादा सुद्धा असा मनुष्य नव्हता की जो आपल्या खऱ्या स्वामीला ओळखत असावा आणि केवळ त्याच्याच समोर आज्ञापालन व गुलामीच्या भावनेने नतमस्तक होत असावा. ज्या जातीत त्यांनी डोळे उघडले होते ती जरी त्या काळात जगातील सर्वात अधिक प्रगत जात होती तरी ती मार्गभ्रष्टतेच्या बाबतीत सुद्धा सर्वात पुढे होती. ज्ञान व कला आणि शिल्प व कारागिरीत प्रगति केलेली असूनदेखील त्या लोकांना इतकी क्षुल्लक गोष्ट सुद्धा सुचत नसे की सृष्टी कदापि उपास्य बनू शकत नाही. त्यांच्यात तारे व मूर्तींचे पूजन होत असे. ज्योतिष, शकून पाहणे, परोक्ष कथन, जादुटोणा व ताईत-गंड्यांचे खूप प्रचलन होते. ज्याप्रमाणे हल्ली हिंदूंमध्ये पंडित व ब्राह्मण आहेत त्याचप्रमाणे त्यांच्याच त्या काळात पुजाऱ्यांचा एक वर्ग होता जो मंदिरांची देखरेख करीत असे. पुजेचे पौरोहित्य करीत असे, विवाहाच्या मंगल व शोक प्रसंगाच्या विधी पार पाडीत असे. परोक्षाच्या वार्ता व भाकित सांगण्याचे सोंगदेखील करीत असे. सामान्य लोक त्यांच्या फंदात अशाप्रकारे अडकलेले होते की त्यांनाच आपल्या चांगल्या व वाईट भाग्याचे कर्ते धर्ते समजत असत. त्यांच्याच इशाऱ्यावर चालत असत आणि कसलीही कां कूं न करता त्यांच्या इच्छेचे पालन करीत असत कारण त्यांची धारणा अशी होती की देव-देवतांपर्यंत त्या पुजाऱ्यांची पोच आहे. जर यांनी इच्छिले तर देवतांच्या कृपेचा आम्हावर वर्षाव होईल नाहीतर आमचा विनाश होईल. पुजाऱ्यांच्या या वर्गाचा राजे लोकांशी समझोता होता. सामान्यजनांना आपला दास बनवून ठेवण्यात राजे पुजाऱ्यांना सहाय्य करीत असत आणि पुजारी राजांना. एकीकडे शासनकर्ते या पुजाऱ्यांचे पाठीराखे होते तर दुसरीकडे हे पुजारी लोकांच्या श्रद्धेत ही गोष्ट पक्की बसवीत असत की तत्कालीन राजादेखील अनेक देवांपैकी एक देव आहे, तो देश व रयतेचा स्वामी आहे, त्याचे वचन कायदा आहे आणि त्याला प्रजेच्या प्राण व संपत्तीवर सर्वप्रकारचे हक्क प्राप्त आहेत, इतकेच नव्हे तर

राजासमोर गुलामीच्या सर्व रिवाजांचे पालन होत असे, जेणेकरून प्रजेच्या मन व बुद्धीवर त्यांच्या देवत्वाचा पगडा टिकून रहावा.

हजरत इब्राहीम (अ.) यांचे घराणे

अशा काळात व अशा जातीत हजरत इब्राहीम (अ.) यांचा जन्म झाला आणि मजेची गोष्टी अशी की ज्या घराण्यात त्यांचा जन्म झाला ते घराणे खुद्द पुजाऱ्यांचे होते. त्यांचे बापजादे आपल्या जातीचे पंडित व ब्राह्मण होते. त्या घरांत तेच शिक्षण व तेच प्रशिक्षण त्यांना मिळू शकत होते जे एका पंडिताच्या मुलाला मिळत असते. अशाच प्रकारच्या गोष्टी बाल्यावस्थेपासून त्यांच्या कानी पडत असत. तेच धर्मगुरू व धर्मगुरू पुत्रांचे रंग ढंग व चाळे ते आपल्या भाऊबंदांत व भाऊकीतील लोकांत पाहत असत. मंदिराची तीच गादी त्यांच्यासाठी तयार होती ज्यावर विराजमान होऊन ते धर्मगुरू बनू शकत होते. त्याच भेटी व प्रसाद आणि नैवेद्य की ज्यांच्यामुळे त्यांचे घराणे संपन्न होत होते त्यांच्यासाठी हजर होते, त्याचप्रमाणे लोक त्यांच्यापुढे हात जोडून श्रद्धेने नतमस्तक होण्यास तयार होते. त्याचप्रमाणे देव-देवताशी संबंध जोडून व परोक्ष-कथनाचे सोंग करून ते साधारण शेतकऱ्यापासून राजापर्यंत प्रत्येकाला आपल्या साधुत्वाच्या जाळयात अडकवू शकत होते. त्या अंधारात एखादा मनुष्यदेखील सत्याचे ज्ञान असणारा व ते मानणारा नव्हता. त्यांना सत्याचा प्रकाशही कोठून मिळणे शक्य नव्हते आणि कोणत्या एखाद्या माणसाचे हे काम नव्हते की त्याने इतक्या प्रचंड व्यक्तिगत व घराण्याच्या लाभांना लात मारून केवळ सत्याच्या पाठीमागे धावून संकटांना आमंत्रण देण्यास तयार व्हावे.

हजरत इब्राहीम (अ.) यांची सुटकेची घोषणा

परंतु हजरत इब्राहीम (अ.) कांही सामान्य मनुष्य नव्हते. कांही वेगळयाच मातीने त्यांची जडण घडण झाली होती. वयात येताच त्यांनी विचार करावयास सुरुवात केली की हे सूर्य, चंद्र व तारे जे स्वतः गुलामाप्रमाणे भ्रमण करीत आहेत आणि या दगडाच्या मूर्ती ज्यांना स्वतः मानवाने आपल्या हाताने घडले आहे आणि हे राजे जे आमच्याप्रमाणेच मानव आहेत, बरे हे कसे ईश्वर बनू शकतात? जे बिचारे

स्वतः आपल्या मनाने हलू शकत नाहीत, ज्यांच्यात स्वतःला सहाय्य करण्याचे सामर्थ्य नाही, जे आपल्या जीवन व मृत्युसाठी मुख्त्यार नाहीत, त्यांच्याजवळ आहे तरी काय की माणसाने त्यांच्यासमोर उपासनेत नतमस्तक व्हावे, त्यांच्याकडून आपल्या इच्छापूर्तीची मागणी करावी, त्यांच्या सामर्थ्याचे भय बाळगावे आणि त्यांची सेवावृत्ती व आज्ञाधारकता स्वीकारावी? पृथ्वी व आकाशातील जितक्या वस्तु आम्हाला दिसतात अथवा ज्यांच्याशी कोणत्याही प्रकारे आम्ही परिचित आहोत, त्यांच्यापैकी तर कोणतीही वस्तु अशी नाही की जिला कोणाचीही गरज नसावी, जी स्वतः एखाद्या शक्तीच्या दबावात नसावी आणि जिचा कधी न कधी ऱ्हास होत नसावा. मग जर या सर्वांची स्थिती अशी आहे तर यांच्यापैकी कोणीही पालनकर्ता कसा होऊ शकेल? जर यांच्यापैकी कोणीही मला निर्माण केले नाही, कोणाच्याही हातात माझे जीवन-मृत्यु व नफा-नुकसान नाही, कोणाच्याही हातात रोजी व गरजा भागविण्याच्या किल्ल्या नाहीत; तर मी त्यांना का पालनकर्ता मानावे व त्यांच्यासमोर गुलामी व आज्ञाधारकता व्यक्त करण्यास मी का नतमस्तक व्हावे? माझा पालनकर्ता तर केवळ तोच असू शकतो ज्याने सर्वांना निर्माण केले, ज्याच्याकडे सर्वजण याचना करतात आणि ज्याच्या अखत्यारीत सर्वांचे जीवन-मृत्यु व नफा-नुकसान आहे. हे पाहून हजरत इब्राहीम (अ.) यांनी अंतिम निर्णय घेतला की ज्या उपास्यांची माझ्या जातीचे लोक पूजा करतात मी त्यांची पूजा कदापि करणार नाही. आणि या निर्णयाप्रत पोचल्यावर त्यांनी जाहीररित्या लोकांना सांगितले की,–

"ज्यांना तुम्ही ईश्वरत्वात भागीदार ठरविता त्यांच्याशी माझा कांहीही संबंध नाही."

- सूरतुल अनआम : ७८

"मी सर्वांकडून तोंड फिरवून त्या व्यक्तित्वास उपासना व गुलामीसाठी विशिष्ट केले आहे ज्याने आकाश व पृथ्वी निर्माण केले आणि मी कदापि अनेकेश्वरवादाचा अवलंब करणार नाही."

- सूरतुल अनआम : ८१

संकटाचे पर्वत

या घोषणेनंतर हजरत इब्राहीम (अ.) यांच्यावर संकटाचे पर्वत कोसळले.

वडिलांनी सांगितले, "मी वारसाहक्क रद्द करीन आणि घरातून हाकलून देईन." जातीच्या लोकांनी सांगितले, "आमच्यापैकी कोणीही तुला आश्रय देणार नाही." राज्य-शासनदेखील त्यांच्या पाठीमागे लागले आणि राजासमोर खटला सुरू झाला. परंतु तो मनुष्य एकटाच सर्वांच्या विरूद्ध सत्यासाठी दृढ उभा राहिला. वडिलांना आदरपूर्वक उत्तर दिले की, जे ज्ञान माझ्यापाशी आहे ते तुम्हाला प्राप्त झाले नाही. म्हणून मी तुमचे अनुकरण करण्याऐवजी तुम्हीच माझे अनुयायी बनले पाहिजे. जातीच्या धमकावणीच्या उत्तरादाखल तिच्या मूर्त्यांना आपल्या हाताने फोडून सिद्ध केले की ज्यांचे पूजन तुम्ही करता त्या स्वतःच किती विवश आहेत. राजाच्या भरलेल्या दरबारात जाऊन स्पष्टपणे सांगितले की तू माझा पालनकर्ता नाहीस तर तो माझा पालनकर्ता आहे की ज्याच्या हातात माझे व तुझे जीवन व मृत्यु आहे. आणि ज्याच्या कायद्याच्या बंधनात सूर्यदेखील जखडलेला आहे. अंततः राजाच्या दरबारात निर्णय लागला की या व्यक्तीला जिवंत जाळून टाकावे. परंतु तो पर्वतापेक्षा अधिक दृढ हृदय बाळगणारा व एक ईश्वरावर विश्वास ठेवणारा मनुष्य अजिबात विचलित झाला नाही व ही भयंकर शिक्षादेखील भोगण्यास तयार झाला. मग जेव्हां अल्लाहने आपल्या सामर्थ्याने त्याला आगीत जळण्यापासून वाचविले तेव्हां तो आपले घरदार, प्रियजन व आप्तेष्ठ, जात व जन्मस्थळ सर्वांना सोडून केवळ आपली पत्नी व पुतण्याला घेऊन व आपल्या देशाचा त्याग करून देशोदेशी दीनवाणे फिरण्यास निघाला. ज्याच्यासाठी महंतपद रिक्त होते, जो त्या पदावर आरूढ होऊन आपल्या जातीचा धर्मगुरू बनू शकत होता, धन-दौलत व प्रतिष्ठा दोन्ही ज्याचे चरण-स्पर्श करण्यास तयार होते आणि जो आपल्या संततीलादेखील महंतपद भूषवून मौज-मजा लुटण्यास पाठीमागे ठेवू शकत होता, त्याने आपल्यासाठी आपल्या संततीसाठी निर्वासन व निर्धनतेच्या जीवनाचा स्वीकार केला, कारण जगातील खोट्या ईश्वरांच्या जाळ्यात लोकांना अडकवून स्वतः मौज-मजा करणे त्याला असह्य होते. आणि त्याच्या तुलनेत त्याला हे स्वीकार्य होते की एका खऱ्या अल्लाहकडे लोकांना बोलवावे आणि या अपराधाची शिक्षा म्हणून कोठेही सुख शांतीने राहू नये.

देहत्याग

स्वदेशाचा त्याग करून हजरत इब्राहीम (अलै.) सीरिया, पॅलेस्टाईन, इजिप्त व अरबस्थानातील देशात हिंडत राहिले. केवळ अल्लाहलाच ठाऊक की या प्रवासी-जीवनात कोणती संकटे आली असतील. आपल्या देशातून निघताना त्यांनी आपल्याबरोबर कोणतीही मालमत्ता घेतलेली नव्हती. देशाबाहेर जाऊन ते रोजी कमविण्याच्या चिंतेत भटकत नव्हते तर रात्रंदिवस त्यांना हीच चिंता होती की लोकांना प्रत्येकाच्या गुलामीतून मुक्त करून एका अल्लाहचे त्यांना गुलाम बनवावे अशा विचारसरणीच्या माणसाला जर त्याच्या स्वतःच्या बापाने त्याच्या स्वतःच्या जातीने सहन केले नाही तर मग अन्य कोण त्याला सहन करू शकेल? त्याचे कोठे स्वागत होईल? सर्व ठिकाणी तसेच मंदिरांचे महंत व तसेच देवत्वाचा दावा करणारे राजे होते, आणि सर्व ठिकाणी तसेच अडाणी सामान्यजण राहत होते जे या खोट्या देवांच्या जाळ्यात अडकलेले होते. त्या लोकांमध्ये तो मनुष्य कसा आरामशीर बसू शकत होता? तो केवळ स्वतःच अल्लाहशिवाय इतर कोणाचेही ईश्वरत्व मान्य करण्यास तयार नव्हता असे नव्हे तर दुसऱ्यांनादेखील जाहीरपणे सांगत फिरत होता की एक अल्लाहशिवाय दुसरा कोणीही तुमचा स्वामी नाही. सर्वांचे स्वामित्व व देवत्व उलथून टाका आणि केवळ त्या एकाचे गुलाम बनून रहा. हेच कारण आहे की हजरत इब्राहीम (अ.) यांना कोणत्याही ठिकाणी शांती लाभली नाही. वर्षानुवर्षे विना बिऱ्हाड भटकत राहिले. कधी किनआनच्या वस्त्यांत, तर कधी इजिप्तमध्ये, तर कधी अरबस्थानच्या ओसाड वाळवंटात. अशाच प्रकारे संपूर्ण तारुण्य निघून गेले आणि काळे केस पांढरे झाले.

संतती व त्यांचे प्रशिक्षण

अखेर वयात जेव्हां ९० वर्षे पूर्ण होण्यास केवळ चार वर्षे उरली होती आणि संततीकडून ते निराश झाले होते तेव्हां अल्लाहने त्यांना संतती दिली. परंतु त्या अल्लाह्चया दासाला अद्याप अशी चिंता वाटली नाही की मी स्वतःची तर निराश्रित झालो आहे तेव्हां कमीत कमी आपल्या मुलांना तरी ऐहिक प्राप्ती करण्यायोग्य बनवावे. आणि त्यांना एखाद्या अशा कामाला लावावे की पोटापाण्याची चिंता राहू नये. नाही, या वृद्ध मुसलमानाला जर कशाची चिंता होती

तर ती अशी की ज्या कार्याच्या प्रसारासाठी त्याने आपले आयुष्य खपविले होते त्याच्या मृत्युनंतर त्या कार्याचा प्रसार करणारा कुणी तरी असावा. म्हणून त्याने अल्लाहकडे संततीची इच्छा व्यक्त केली होती. जेव्हां अल्लाहने संतती दिली तेव्हां त्याने असेच इच्छिले की आपले कार्य सुरू ठेवण्यासाठी त्यांना तयार करावे. या परिपूर्ण माणसाचे जीवन एका खऱ्या व अस्सल मुसलमानाचं जीवन होते. वयात आल्यानंतर प्रारंभिक तारुण्यातच जेव्हां त्याने आपल्या अल्लाहला ओळखले तेव्हां अल्लाहने त्याला सांगितले होते,– *"इस्लामचा स्वीकार कर. स्वतःला माझ्या सुपुर्त कर. माझा बनून रहा."* आणि उत्तरादाखल त्याने कबूल केले होते की, *"मी इस्लामचा स्वीकार केला, मी जगांच्या पालनकर्त्याचा झालो. मी स्वतःला त्याच्या सुपुर्त करून टाकले."* या वचन व प्रतिज्ञेला त्या खऱ्या माणसाने संपूर्ण आयुष्यभर दृढतेने निभावले. त्याने जगांच्या पालनकर्त्यासाठी शेकडो वर्षांच्या पैतृक धर्म व त्याच्या रिवाज व श्रद्धांचा त्याग केला आणि त्या सर्व ऐहिक लाभांचा त्याग केला, स्वतःच्या प्राणाला अग्नीच्या धोक्यात लोटले. निर्वासित जीवनाच्या पीडा सहन केल्या. देशोदेशी भटकत राहिला, आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण जगांच्या पालनकर्त्याच्या आज्ञापालनात व त्याच्या धर्माच्या प्रसारासाठी त्याने खर्च केला आणि म्हातारपणी जेव्हां संततीची प्राप्ती झाली तेव्हां त्याच्यासाठीदेखील हाच धर्म व हेच कार्य पसंत केले.

सर्वात कठीण परीक्षा

परंतु या परीक्षेनंतर आणखी एक अंतिम परीक्षा उरली होती. त्या परीक्षेशिवाय याचा निर्णय होणे शक्य नव्हते की हा मनुष्य खरोखर सर्व वस्तुंपेक्षा जगाच्या पालनकर्त्यावर अधिक प्रेम करतो. आणि ती परीक्षा अशी होती की या वृद्धापकाळात की जेव्हां संपूर्ण निराशेनंतर त्याला संतती झाली होती, त्या आपल्या एकुलत्या एक पुत्राचा जगाच्या पालनकर्त्यासाठी तो बळी देऊ शकतो किंवा नाही. म्हणून ही परीक्षादेखील घेऊन टाकली, आणि जेव्हां इशारा मिळताच तो आपल्या मुलाचा स्वतःच्या हाताने बळी घेण्यास तयार झाला तेव्हां निर्णय दिला गेला की खरोखर आता तुम्ही मुस्लिम असल्याबद्दलचा आपला दावा खरा करून दाखविला. आता तुम्ही यास पात्र झाला की तुम्हाला साऱ्या जगाचा 'इमाम' (नेता) बनविले

जावे. याच गोष्टीचे वर्णन पवित्र कुरआनमध्ये असे केले गेले आहे–

'इमामते आलम'वर (जगाच्या नेतेपदावर) प्रतिष्ठापना

"आणि जेव्हां हजरत इब्राहीम (अ.) याला त्याच्या पालनकर्त्याने कांही गोष्टीत अजमाविले आणि तो त्यात पुरा उतरला तेव्हां फर्माविले की मी त्याला मानवांचा इमाम (पेशवा अर्थात नेता) बनवितो. त्याने विचारणा केली की माझ्या संततीसंबंधी काय आज्ञा आहे? उत्तर दिले गेले, त्यांच्यापैकी जे जुलुमी असतील त्यांना माझे वचन पोचत नाही."

- सूरतुल बकरह : १२४

अशाप्रकारे हजरत इब्राहीम (अ.) यांना पेशवाई (नेतृत्व) बहाल केली गेली. आणि ते इस्लामच्या जगव्यापी चळवळीचे नेते बनविले गेले. आता त्यांना या चळवळीच्या प्रसारासाठी अशा लोकांची आवश्यकता होती की ज्यांनी विभिन्न प्रदेशात ठाण मांडून बसावे आणि त्यांचे प्रतिनिधी अथवा सहाय्यक म्हणून काम करावे. या कार्यात तीन व्यक्ती त्यांचे बाहुबल सिद्ध झाले. एक त्यांचे पुतणे हजरत लूत (अ.), दुसरे त्यांचे थोरले चिरंजीव हजरत इस्माईल (अ.) ज्यांनी हे ऐकून की जगांचा पालनकर्ता त्यांच्या प्राणाच्या दानाची इच्छा बाळगतो, त्यांनी आपली मान स्वतः आनंदाने सुरीखाली ठेवली. तिसरे त्यांचे कनिष्ठ चिरंजीव हजरत इसहाक (अ.) होत.

हजरत लूत (अ.) यांना पूर्व जॉर्डनला पाठविले

त्यांनी आपल्या पुतण्याला सदूमच्या प्रदेशात वसविले. त्या प्रदेशाला हल्ली पूर्व जॉर्डन (ट्रान्स जॉर्डेनिया) म्हणून ओळखले जाते. येथे त्या काळातील सर्वात दुराचारी जात राहत असे. म्हणून त्यांची सुधारणा डोळ्यांसमोर होती आणि त्याचबरोबर दूरवरच्या प्रदेशावर प्रभाव टाकण्याचा हेतु होता. त्याला कारण असे होते की इराण, इराक व इजिप्तच्या दरम्यान ये-जा करणारे सर्व व्यापारी काफिले याच प्रदेशातून जात असत आणि येथे स्थित होऊन दोन्हींकडे धर्मप्रचाराचे कार्य केले जाऊ शकत होते.

हजरत इसहाक (अ.) यांची पॅलेस्टाईनला रवानगी

धाकटे चिरंजीव हजरत इसहाक (अ.) यांना किनआनच्या प्रदेशात बसविले. हल्ली या प्रदेशाला पॅलेस्टाईन असे म्हणतात. हा प्रदेश सीरिया व इजिप्तच्या दरम्यान आहे. आणि समुद्रकिनाऱ्यावर असल्यामुळे अन्य देशांशी संपर्क साधून अन्य देशांवर येथून प्रभाव टाकला जाऊ शकत होता. येथूनच हजरत इसहाक (अ.) यांचे पुत्र हजरत याकूब (अ.) (ज्यांचे नाव इस्राईलदेखील होते) आणि पौत्र- हजरत यूसुफ (अ.) यांच्यामुळे इस्लामची चळवळ इजिप्तपर्यंत पोचली.

हजरत इस्माईल (अ.) यांना हिजाज (अरबस्थान) मध्ये ठेवले

आपल्या ज्येष्ठ चिरंजीव हजरत इस्माईल (अ.) यांना हिजाज (अरबस्थान) मधील मक्का या ठिकाणी ठेवले आणि एका विशिष्ठ मुदतीपर्यंत स्वतः हजरत इब्राहीम (अ.) यांनी त्यांच्याबरोबर राहून अरबस्थानच्या सर्व कानाकोपऱ्यापर्यंत इस्लामी शिकवणीचा प्रसार केला.

काब्याची रचना

मग येथेच दोन्ही पिता-पुत्रांनी इस्लामी चळवळीचे ते केंद्र बांधले ज्याची काबा म्हणून संपूर्ण जगात ख्याति आहे. या केंद्राची निवड स्वतः महान अल्लाहने केली होती व स्वतःच या वास्तूच्या रचनेसाठी जागा सुचविली होती. ही इमारत केवळ उपासना-स्थळच नव्हती, जशा इतर मसजिद असतात, तर प्रथम दिवसापासूनच इला इस्लाम धर्माच्या विश्वव्यापी चळवळीच्या प्रचार व प्रसाराचे केंद्र ठरविले गेले होते. याचा हेतु असा होता की एका अल्लाहला मानणारे सर्व ठिकाणाहून आकर्षित होऊन त्यांनी येथे एकत्रित होत रहावे. सर्वांनी मिळून अल्लाहची उपासना करावी आणि इस्लामचा संदेश घेऊन त्यांनी आपापल्या देशाला परत जावे. हेच ते 'सम्मेलन' होते ज्याचे नाव 'हज' ठेवले गेले. या केंद्राची रचना कशी झाली, कोणत्या भावना व कोणत्या दुआ (प्रार्थना) करून दोन्ही पिता-पुत्रांनी मिळून या इमारतीच्या भिंती उभ्या केल्या आणि हजचा प्रारंभ कशाप्रकारे झाला याचा पूर्ण तपशील पवित्र कुरआनमध्ये असा दिला आहे–

"निश्चितपणे प्रथम घर जे लोकांसाठी ठरविले गेले होते ते तेच होते ज्याची रचना मक्का येथे केली गेली, बरकतचे (भरभराटीचे) घर, आणि सर्व जगवासियांसाठी मार्गदर्शनाचे केंद्र. यात अल्लाहच्या उघड निशाण्या आहेत, हजरत इब्राहीम (अ.) यांचे स्थान आहे आणि जो यात प्रवेश करतो त्याला सुख-शांतीचा लाभ होतो."- सूरह आले इम्रान : ९६-९७

"काय लोकांनी हे पाहिले नाही की आम्ही हरमला (काबा व मक्केच्या सभोवारचा प्रदेश) किती शांतिपूर्ण बनविले होते? वास्तविकतः याच्या जवळपास लोक हिरावून घेतले जातात. (अर्थात जेव्हां अरबस्थानात सर्वत्र लूटमार, कत्तल, दरोडेखोरी, लढाया व युद्धाचे नग्न-नृत्य चालले होते, त्या 'हरम'मध्ये सदैव शांतिच नांदत राहिली आहे. येथपावेतो की रानटी बुद्दू लोक सुद्धा त्याच्या हद्दीत आपल्या वडिलांच्या खुन्याला पाहूनदेखील त्याच्यावर हल्ला करण्याचे धाडस करीत नसत."

- सूरतुल अनकबुत : ६७

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या दुआ

"आणि जेव्हां आम्ही या घराला लोकांसाठी केंद्र, आश्रयस्थान व शांति-स्थळ बनविले व आज्ञा दिली की हजरत इब्राहीम (अ.) यांच्या उपासना स्थळाला नमाजची जागा बनवा. आणि हजरत इब्राहीम (अ.) आणि इस्माईल (अ.) यांना आदेश दिला की माझे घर प्रदक्षिणा घालणाऱ्यांसाठी व थांबणाऱ्यांसाठी आणि रूकूअ व सिजदा (नमाज पढणे) करणाऱ्या लोकांसाठी शुचिर्भूत व स्वच्छ ठेवा. आणि जेव्हां हजरत इब्राहीम (अ.) यांनी दुआ केली की हे पालनकर्त्या! या शहराला शांतिपूर्ण शहर बनव आणि येथील त्या नागरिकांना फळांचे अन्न उपलब्ध करून दे, जे यांच्यापैकी अल्लाह व अंतिम दिनावर ईमान आणणारे असतील.---- आणि जेव्हां हजरत इब्राहीम (अ.) व हजरत इस्माईल (अ.) या घराचा पाया उंचावत होते तेव्हां दुआ (प्रार्थना) करीत जात होते की, हे पालनकर्त्या! आमच्या या प्रयत्नाला स्वीकृती दे, तू सर्व कांही ऐकतोस व जाणतोस. हे पालनकर्त्या! आणि तू आम्हा

दोघांना आपला मुस्लिम (आज्ञाधारक) बनव. आणि आमच्या वंशातून एका अशा जातीचा अविर्भाव कर जी तुझी आज्ञाधारक असावी आणि आम्हाला तुझ्या उपासनेच्या पद्धती शिकव आणि आमच्यावर दया दृष्टी ठेव कारण तू फार क्षमाशील व कृपाळू आहेस. हे पालनकर्त्या! आणि तू त्या लोकांत एक असा प्रेषित पाठव जो त्यांना तुझ्या आयात (ईश्वरी वचन) ऐकवील आणि त्यांना ग्रंथ व शहाणपणाचे शिक्षण देईल व त्यांचे चारित्र्य सुधारील, निश्चितपणे तू मोठा सामर्थ्यवान आहेस आणि मोठा विवेकी आहेस.'' - सूरतुल बकरह : १२५-१२९

आणि जेव्हां हजरत इब्राहीम (अ.) यांनी दुआ मागितली, ''हे पालनकर्त्या! या शहराला शांतिपूर्ण शहर बनव आणि मला व माझ्या मुलांना मूर्तिपूजेपासून वाचव. हे पालनकर्त्या! या मूर्त्यांनी बहुतेक लोकांना मार्गभ्रष्ट केले आहे म्हणून जो कोणी माझ्या पद्धतीचा अवलंब करील तो माझा आहे आणि जो माझ्या पद्धतीपासून पराङ्मुख होईल तर निश्चितपणे तू क्षमा करणारा व दया करणारा आहेस. हे पालनकर्त्या! मी आपल्या वंशाच्या एका भागाला तुझ्या या प्रतिष्ठित घरापाशी आणून या निर्जळ व तृणहीन खोऱ्यात बसविले आहे जेणेकरून यांनी नमाजचा प्रबंध करावा म्हणून हे पालनकर्त्या! तू लोकांच्या मनात अशी आवड उत्पन्न कर की ते त्यांच्याकडे आकर्षित होऊन यावेत आणि त्यांना फळांचे अन्न उपलब्ध करून दे. आशा आहे की हे तुझे कृतज्ञ बनतील.'' - सूरह इब्राहीम : ३५-३७

''आणि जेव्हां आम्ही इब्राहीम (अ.) यांच्यासाठी त्या घराची जागा या आदेशासह निश्चित केली की येथे अनेकेश्वरवादाचा अवलंब होऊ नये आणि माझ्या घराला प्रदक्षिणा (तवाफ) घालणाऱ्यांसाठी व थांबणाऱ्या आणि रूकूअ व सिजदा करणाऱ्यांसाठी (नमाज पढणाऱ्यांसाठी) शुचिर्भूत व स्वच्छ ठेवा आणि लोकांत हजची आम दवंडी (घोषणा) द्या की त्यांनी तुमच्याजवळ यावे, मग ते पायी येवोत अथवा लांब-लांबच्या ठिकाणाहून सडपातळ उंटिणीवरून येवोत, जेणेकरून त्यांनी हे पहावे की

त्यांच्यासाठी कसले कसले धार्मिक व ऐहिक फायदे आहेत आणि त्या कांही ठराविक दिवसांत त्या जनावरावर, जे अल्लाहने त्यांना दिले असतील, अल्लाहचे नाव घ्यावे (बळी द्यावे) आणि यापैकी स्वतःदेखील खावे व गरीब व मोताद लोकांना सुद्धा खाऊ घालावे."

- सूरतुल हज्ज : २६-२८

इस्लामी बंधुनो! अशी आहे हजच्या प्रारंभाची कथा, ज्याला इस्लामचा पाचवा स्तंभ ठरविले गेले आहे. यावरून आपल्या लक्षात आले असेल की जगात सर्वप्रथम ज्या पैगंबराला इस्लामच्या जगव्यापी आवाहनाचा प्रसार करण्यासाठी नियुक्त केले गेले होते त्याच्या धर्मप्रचाराचे प्रमुख ठिकाण मक्का शहर होते. काबा ते केंद्र होते जेथून जगातील विभिन्न कानाकोपऱ्यांत धर्माचा प्रचार केला जात असे आणि हजची पद्धत या कार्यासाठी ठरविली गेली होती. त्याला कारण असे होते की जे लोक एका अल्लाहच्या उपासनेचा स्वीकार करतील आणि त्याची आज्ञाधारकता अवलंबितील, मग ते कोणत्याही जातीचे आणि कोणत्याही देशाशी त्यांचा संबंध का असेना, त्या सर्वांनी या केंद्राशी संबद्ध व्हावे आणि प्रत्येक वर्षी येथे एकत्रित होऊन या केंद्राच्या सभोवती प्रदक्षिणा घालाव्यात, जणु प्रकटरित्या त्यांनी आपल्या आंतरिक स्थितीचे असे चित्र उपस्थित करावे की त्यांचे जीवन त्या चाकाप्रमाणे आहे जे सदैव आपल्या कण्याभोवतीच फिरत राहते.

हजची तारीख

इस्लामी बंधुनो! मागील प्रवचनात मी आपल्याला सांगितले आहे की हजचा प्रारंभ कशाप्रकारे व कोणत्या उद्देशाने झाला होता. हेदेखील आपल्याला सांगितले आहे की हजरत इब्राहीम (अ.) यांनी मक्का शहराला या इस्लामी चळवळीचे केंद्र बनविले होते. आणि येथे आपल्या सर्वात ज्येष्ठ चिरंजीव हजरत इस्माईल (अ.) यांना वसविले होते जेणेकरून हजरत इब्राहीम (अ.) यांच्या पश्चात त्यांनी ही चळवळ सुरू ठेवावी.

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या संततीत मूर्तिपूजेची प्रथा

अल्लाहलाच चांगल्याप्रकारे ठाऊक असेल की हजरत इस्माईल (अ.) यांच्या पश्चात त्यांची संतती कोठपर्यंत त्या धर्मावर टिकून राहिली ज्या धर्मावर त्यांच्या वडिलांनी त्यांना सोडून या जगाचा निरोप घेतला होता. कांही शतकात हे लोक आपल्या पूर्वजांची शिकवण व त्यांच्या पद्धती सर्वकांही विसरून गेले आणि हळू हळू त्यांच्यात त्या सर्व प्रकारच्या मार्गभ्रष्टतेने जन्म घेतला ज्या प्रकारच्या दुसऱ्या अज्ञानी जातीत पसरल्या होत्या. त्याच काळात, ज्याला एक अल्लाहच्या उपासनेसाठी आवाहन व प्रचाराचे केंद्र बनविले गेले होते, त्यात शेकडो मूर्त्या ठेवल्या गेल्या होत्या आणि गहजब असा की, खुद्द हजरत इब्राहीम (अ.) व हजरत इस्माईल (अ.) यांच्या सुद्धा मूर्त्या बनविल्या गेल्या की ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मूर्तिपूजा नष्ट करण्यासाठी वेचले होते. हजरत इब्राहीम (अ.) यांच्या अनुयायांच्या वंशजांनी लात, मनात, हुबल, नस्र, मगूस, उज़्ज़ा, असाफ, नायला आणि अल्लाहजाणो कोणकोणत्या नावांच्या मूर्त्या बनविल्या आणि त्यांचे पूजन केले. चंद्र, बुध, शुक्र, शनि आणि न जाणो कोणकोणत्या ग्रहांचे पूजन केले. जिन्न, भूत, प्रेत, देवदूत आणि आपल्या मृत पूर्वजांच्या आत्म्यांचे पूजन केले. अज्ञानाचा प्रभाव इतका वाढला की जेव्हां ते घरातून निघत आणि आपल्या कुळाच्या मूर्तीची पूजा करावयास मिळाली नाही तर रस्त्यात जो चांगला गुळगुळीत दगड त्यांना मिळे त्याचीच पूजा करीत आणि दगड न मिळाल्यास माती पाण्यात मळून एका पिंडीसारखे बनवीत आणि शेळीचे दूध त्यावर शिंपताक्षणी ते निर्जीव पिंड त्यांचा ईश्वर बनत असे. ज्या

महंतगिरी व पंडिताईविरूद्ध त्यांचे पिता हजरत इब्राहीम (अ.) यांनी इराकमध्ये युद्ध केले होते ती खुद्द त्यांच्याच घरात घुसली होती. काब्याला त्यांनी जणु हरिद्वार व काशी बनविले होते आणि स्वतः तेथील महंत म्हणून ठाण मांडले होते. हजला तीर्थयात्रा बनवून त्या घरातून की जे एकेश्वरवादाच्या प्रचारासाठी बनले होते, तेथून मूर्तिपूजेचा प्रचार करू लागले आणि पुजाऱ्यांच्या सर्व क्लृप्त्यांचा अवलंब करून त्यांनी अरबस्थानाच्या सभोवतालच्या प्रदेशातून यात्रेकरूकडून नजराणे व मूर्त्यांवर वाहिल्या जाणाऱ्या जिन्नसांची वसुली सुरू केली. अशाप्रकारे त्या सर्व कार्यावर पाणी फिरले जे कार्य हजरत इब्राहीम (अ.) व हज़रत इस्माईल (अ.) करून गेले होते. आणि ज्या उद्देशासाठी त्यांनी हजची पद्धत सुरू केली होती त्याऐवजी भलतीच कामे सुरू झाली.

हजमधील बिघाडांचे स्वरूप

काव्य-स्पर्धा

या अज्ञान युगात हजची जी दुर्दशा झाली तिची कल्पना आपण केवळ यावरून करू शकता की हज म्हणजे एक यात्रा होती जी प्रत्येक वर्षी भरत असे. मोठमोठाल्या टोळ्या आपापल्या जथ्याबरोबर येत असत व पडाव घालीत असत. प्रत्येक टोळीचा कवि अथवा भाट आपल्या व आपल्या टोळीवाल्यांच्या शौर्य, प्रसिद्धी, प्रतिष्ठा, सामर्थ्य व दातृत्वाच्या प्रशंसेत अतिशयोक्ती करीत असे व प्रत्येकजण बढाया मारण्यात सर्वांपेक्षा सरस ठरण्याचा प्रयत्न करीत असे. येथपावेतो की दुसऱ्यांची निंदा व विडंबनापर्यंत त्यांची मजल जात असे.

खोट्या दानाचे प्रदर्शन

याशिवाय दातृत्वाची स्पर्धा होत असे. प्रत्येक टोळीचे सरदार आपले श्रेष्ठत्व गाजविण्यासाठी डेगा (स्वयंपाकाचे मोठे पातेले) चढवीत व एक दुसऱ्याला खाली दाखविण्यासाठी उंटामागे उंट कापीत जात असत. या अपव्ययामागे त्या लोकांचा या शिवाय कोणताही उद्देश नव्हता की या यात्रेच्या प्रसंगी त्यांचे नाव संपूर्ण अरबस्थानात उंच व्हावे आणि अशी चर्चा होत रहावी की अमुक महाशयांनी इतके उंट कापले व तमुक महाशयांनी इतक्या लोकांना भोजन दिले. या मैफिलीत

रागरंग, मद्यपान, व्यभिचार व सर्व प्रकारची अश्लील कृत्ये खूप धडाक्याने होत असत आणि अल्लाहचे स्मरण एखाद्याला चुकूनच होत असेल.

नग्न प्रदक्षिणा

काब्याच्या सभोवती प्रदक्षिणा होत असे, परंतु कशी? पुरुष-स्त्रिया सर्व नग्न होऊन प्रदक्षिणा घालीत असत आणि म्हणत असत की आम्ही त्या स्थितीत अल्लाहसमोर जाऊ ज्या स्थितीत आमच्या मातांनी आम्हाला जन्म दिले होते. हजरत इब्राहीम (अ.) यांच्या मसजिदमध्ये उपासना होत असे, परंतु कशी? टाळ्या वाजविल्या जात, शिट्या वाजविल्या जात व शिंग फुंकले जाई. अल्लाहचे नाव पुकारले जाई, परंतु कसे?– ***"मी हजर आहे माझ्या अल्लाह मी हजर आहे, तुझा कोणीही भागीदार नाही, परंतु तो जो तुझा असल्यामुळे तुझा भागीदार आहे, तू त्याचा सुद्धा स्वामी आहेस व त्याच्या मिळकतीचा सुद्धा स्वामी आहेस."***

कुर्बानीची कल्पना

अल्लाहच्या नावाने कुर्बानी करीत असत, परंतु किती अशिष्टपणे? कुर्बानीच्या प्राण्याचे रक्त काब्याच्या भिंतीवर लावले जात असे आणि मांस दारावर घातले जाई. ते असे या विचाराने करीत की, हे रक्त व मांस अल्लाहला हवे आहे.

प्रतिष्ठित महिन्यांची अप्रतिष्ठा

हजरत इब्राहीम (अ.) यांनी हजच्या चार महिन्यांना प्रतिष्ठित ठरविले होते, आणि आदेश दिला होता की या महिन्यात कोणत्याही प्रकारचे भांडण-तंटे व युद्ध होऊ नयेत. हे लोक या प्रतिष्ठेचा एका सीमेपर्यंत भान ठेवीत असत. परंतु जर त्यांची लढण्याची इच्छा झाली तर उद्दामपणे एखाद्या वर्षी हराम (प्रतिष्ठित, पवित्र) महिन्याला धर्मसम्मत (लढाईसाठी) बनवीत असत आणि दुसऱ्या वर्षी त्याची फेड करीत असत.

कांही स्वरचित निर्बंध

याशिवाय जे लोक धर्माच्या बाबतीत धर्मनिष्ठ होते त्यांनी सुद्धा अज्ञानामुळे

अजब अजब पद्धती शोधून काढल्या होत्या. कांही लोक आपल्याबरोबर शिदोरी न घेता निघत असत व मागून खात प्रवास करीत असत. त्यांच्या दृष्टीने हे पुण्य-कार्य होते. ते म्हणत असत की, आम्ही जगाची सामुग्री का घ्यावी? सामान्यपणे हजच्या प्रवासात व्यापार करणे अथवा कमाईसाठी परिश्रम करणे अनुचित मानले जाई. बरेचसे लोक हज दरम्यान खाणे-पिणे वर्ज्य करीत असत आणि तेही उपासनेचा भाग समजत असत. कांही लोक जेव्हां हजला निघत तेव्हां बोलचाल बंद करीत असत. याचे नाव 'हज्जे मुसमित' म्हणजे 'मुकी हज' होते. अशाच प्रकारच्या आणखी असंख्य प्रथा होत्या ज्यांचे वर्णन करून मी आपला वेळ वाया घालवू इच्छित नाही.

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या प्रार्थनेला स्वीकृती

अशी स्थिती कमी-अधिक प्रमाणात दोन हजार वर्षांपर्यंत राहिली. या दीर्घ मुदतीत अरबस्थानात कोणी पैगंबर जन्मास आला नाही, आणि एखाद्या पैगंबराची केवळ शिकवणदेखील लोकांपर्यंत पोचली नाही. अखेरीस हजरत इब्राहीम (अ.) यांच्या त्या दुआची (प्रार्थनेची) पूर्तता होण्याची वेळ आली जी त्यांनी काब्याच्या भिंती उभ्या करताना केली होती. ती म्हणजे, ***"हे पालनकर्त्या! त्यांच्या दरम्यान एक पैगंबर त्यांच्यापैकीच पाठव, ज्याने तुझ्या आयात (वचने) त्यांना ऐकवाव्यात आणि ग्रंथाचे ज्ञान व बुद्धिमत्तेची शिकवण द्यावी आणि त्यांचे चारित्र्य सुधारावे."*** म्हणून हजरत इब्राहीम (अ.) यांच्या संततीतून पुन्हा एक परिपूर्ण मनुष्य जन्मास आला ज्याचे पवित्र नाव मुहम्मद बिन अब्दुल्लाह (स.) असे होते.

ज्याप्रकारे हजरत इब्राहीम (अ.) यांनी पंडित व महंतांच्या कुळात जन्म घेतला होता त्याचप्रमाणे हजरत मुहम्मद (स.) यांनी सुद्धा अशा कुळात जन्म घेतला जे अनेक शतकांपासून काबा या तीर्थस्थानाचे महंत बनून राहिले होते. ज्याप्रमाणे हजरत इब्राहीम (अ.) यांनी आपल्या हाताने आपल्या कुळाच्या महंतपदावर वार केला तसाच आघात हजरत मुहम्मद (स.) यांनी त्यावर केला आणि केवळ आघातच केला असे नव्हे तर त्याचे मूळच कायमस्वरूपी छाटून टाकले. मग ज्याप्रमाणे हजरत इब्राहीम (अ.) खोट्या-श्रद्धा व खोट्या ईश्वराचे ईश्वरत्व

मिटविण्यासाठी प्रयत्न केले होते आणि एकाच अल्लाहच्या गुलामीचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला होता, अगदी तेच कार्य हजरत मुहम्मद (स.) यांनी सुद्धा केले. आणि पुन्हा त्याच मूळ व पवित्र धर्माचे पुनरुज्जीवन केले ज्याला हजरत इब्राहीम (अ.) घेऊन आले होते. एकवीस वर्षांच्या मुदतीत जेव्हां हे सर्व काम हजरत मुहम्मद (स.) यांनी पूर्णत्वास पोचविले तेव्हां अल्लाहच्या आज्ञेने त्यांनी पुन्हा त्याचप्रमाणे काब्याला संपूर्ण जगातील अल्लाहची उपासना करणाऱ्यांचे केंद्र बनविल्याची घोषणा केली आणि पुन्हा तीच दवंडी (घोषणा) दिली की सर्व बाजूंनी हजसाठी या केंद्राकडे या.

"आणि लोकांवर अल्लाहचा हक्क आहे की जो कोणी या घरापर्यंत येण्याचे सामर्थ्य बाळगत असेल त्याने हजसाठी यावे. मग जर कोणी कुफ्र करील (म्हणजे सामर्थ्य असूनदेखील आला नाही) तर अल्लाह सर्व जगवासियांकडून बेपर्वा आहे." *- सूरह आले इम्रान : ९७*

हजरत इब्राहीम (अ.) यांच्या सुन्नतचे (परंपरेचे) पुनरुज्जीवन

अशाप्रकारे हजचा पुन्हा प्रारंभ केल्यानंतर अज्ञान युगातील त्या सर्व प्रथादेखील लेखणीच्या एका फटकारासरशी नष्ट केल्या गेल्या ज्यांचे प्रचलन गेल्या दोन हजार वर्षांत झाले होते.

मूर्तिपूजेचा अंत.

काब्यातील सर्व मूर्त्या फोडल्या गेल्या, अल्लाहशिवाय दुसऱ्यांची जी उपासना तेथे होत होती तिला पूर्णपणे प्रतिबंध घातले गेले. सर्व रिवाज बंद केले गेले, यात्रा व तमाशे संपुष्टात आले आणि आज्ञा दिली गेली की, आता जी पद्धत उपासनेची दाखविली जात आहे केवळ त्याच पद्धतीने येथे उपासना करा.

"अल्लाहचे स्मरण अशाप्रकारे करा जसा अल्लाहने तुम्हाला आदेश दिला आहे, नाहीपेक्षा यापूर्वी तुम्ही तर मार्गभ्रष्ट लोकचं होता."

- सूरतुल बकरह : १९८

असभ्य कृत्ये करण्यास मनाई

सर्व प्रकारची असभ्य कृत्ये करण्यास सक्त मनाई केली गेली.

"हजमध्ये कामवासनेशी संबंधित कृत्ये केली जाऊ नयेत व दुराचार केला जाऊ नये आणि भांडण-तंटेही होऊ नयेत."

- सूरतुल बकरह : १९७

काव्य गोष्ठी बंद

काव्य गोष्ठी व स्पर्धा, पूर्वजांच्या कर्तबगारीवरील गर्व, भाटवृत्तीच्या काव्यावर व निंदाव्यंजक काव्यावर बंदी आली.

"मग जेव्हां तुमच्या हजच्या विधि पूर्ण होतील तेव्हां ज्याप्रमाणे तुम्ही आपल्या पूर्वजांचे गुणगान करीत होता आता तसे अल्लाहचे स्मरण करा इतकेच नव्हे तर त्यापेक्षाही जास्त." *- सूरतुल बकरह : २००*

दातृत्वाच्या प्रदर्शनाचा अंत

दातृत्वाच्या स्पर्धा ज्या केवळ दाखविण्यासाठी व कीर्ति व नाव होण्यासाठी होत होत्या त्या सर्वांचा अंत केला गेला आणि त्याऐवजी तीच हजरत इब्राहीम (अ.) यांच्या काळातील पद्धत पुन्हा जिवंत केली गेली की केवळ अल्लाहच्या नावाने जनावरे कापली जावीत जेणेकरून सुखवस्तु लोकांच्या कुर्बानीमुळे गरीब हाजी लोकांनादेखील खाण्याची संधी मिळावी.

"खा, प्या, परंतु उधळपट्टी करू नका कारण अल्लाह उधळपट्टी करणाऱ्यांना पसंत करीत नाही." *- सूरतुल अअराफ : ३१*

"या जनावरांना केवळ अल्लाहसाठी त्याच्याच नावाने बळी द्या, मग जेव्हां त्यांच्या पाठी जमिनीवर स्थिर होतील (म्हणजे जेव्हां प्राण पूर्णपणे निघून जाईल व हालचाल राहणार नाही) तेव्हां स्वतःदेखील त्यातून खा व अल्पसंतुष्टांना व गरजू याचकांना सुद्धा खाऊ घाला."

- सूरतुल हज्ज : ३६

कुर्बानीच्या जनावराचे रक्त माखणे व मांस टाकणे बंद

कुर्बानीच्या प्राण्याचे रक्त काब्याच्या भिंतीवर माखण्याचीपद्धत बंद केली गेली व मांस आणून दारावर टाकणे बंद केले गेले आणि म्हटले गेले–

"अल्लाहपाशी या प्राण्यांचे मांस व रक्त पोचत नाही तर तुमची ईशभीरूता व दयाळूपणा पोचतो." - सूरतुल हज्ज ३७

नग्न प्रदक्षिणा घालण्यास मनाई

नग्न होऊन प्रदक्षिणा घालण्यास पूर्णपणे मनाई केली गेली आणि फर्माविले–

"हे पैगंबर (स.) त्यांना सांगा की अल्लाहच्या त्या शोभेला कुणी निषिद्ध केले जी अल्लाहने आपल्या दासाकरिता काढली होती (म्हणजे पोषाख)?" - सूरतुल अअराफ : ३२

"हे पैगंबर (स.) सांगा की अल्लाह तर कदापि निर्लज्जपणाची आज्ञा देत नाही." - सूरतुल अअराफ : २८

"हे आदमच्या मुलांनो! प्रत्येक उपासनेच्या वेळी आपली शोभा (म्हणजे पोषाख) परिधान करीत जा." - सूरतुल अअराफ : ३१

हजच्या महिन्यात परिवर्तन करण्यास मनाई

हजच्या महिन्यात फेरबदल करणे व पवित्र (हराम) महिन्यांना युद्धासाठी धर्मसम्मत (हलाल) ठरविण्यास सक्तीने मनाई केली गेली.

"नसी (महिने बदलणे) तर अनेकेश्वरवादात आणखी एक वृद्धी आहे (म्हणजे अनेकेश्वरवादाबरोबरच उद्दामपणाची वाढ आहे.). अनेकेश्वरवादी लोक या पद्धतीमुळे अधिकच मार्गभ्रष्ट केले जातात. एखाद्या वर्षी एखाद्या महिन्याला हलाल (धर्मसंमत) ठरवितात आणि दुसऱ्या वर्षी त्याच्या बदल्यात एखादा अन्य महीना हराम (निषिद्ध) करून टाकतात, जेणेकरून जितके महीने अल्लाहने हराम ठरविले आहेत, त्यांची संख्या पूर्ण केली जावी. परंतु या बहाण्याने मूलतः त्याला हलाल करून घेतले

जावे ज्याला अल्लाहने हराम केले होते." - सूरतुत्तौबह : ३७

शिदोरी घेण्याची आज्ञा

शिदोरी बरोबर घेतल्याशिवाय हजसाठी निघण्यास मनाई केली गेली आणि म्हटले गेले–

"शिदोरी अवश्य घ्या कारण (जगात शिदोरी न घेणे परलोकाची शिदोरी नव्हे) परलोकाची उत्तम शिदोरी तर ईशभीरूता आहे."

- सूरतुल बकरह : १९७

हज प्रवासात कमाई करण्यास परवानगी

हज प्रवासात कमाई न करण्यास जे पुण्य-कर्म समजले जात असे आणि रोजी कमविण्यास अनुचित समजले जाई ते चुकीचे ठरविले गेले.

"कांही हरकत नाही जर तुम्ही उद्योगाद्वारे आपल्या पालनकर्त्याच्या कृपा प्रसादाचा शोध करीत जाल." *- सूरतुल बकरह : १९८*

अज्ञानकाळातील प्रथांचा अंत

मुके हज व उपाशी तापाशी हज करण्यास मज्जाव केला गेला आणि अशाप्रकारे अज्ञान युगाच्या दुसऱ्या सर्व प्रथांचा अंत करून हजला ईशभीरूता, अल्लाहचे भय, शुचिर्भूतता व साधेपणा आणि फकीरीचा नमुना बनविले गेले.

हाजी लोकांना आज्ञा दिली गेली की, जेव्हां आपली घरे सोडाल तेव्हां स्वतःला जगातील सर्व घाणीपासून शुद्ध करा, कामवासनेचा त्याग करा, पत्न्यांशीदेखील या काळात पति-पत्नीचे संभोगाचे संबंध ठेऊ नका. शिवीगाळ व सर्व असभ्य कृतीपासून दूर रहा.

मीक़ातची निश्चिती

काबाकडे येणारे जितके मार्ग आहेत त्या सर्वांवर अनेक मैल अंतरावर एक एक सीमा निश्चित केली गेली की या सीमा ओलांडण्यापूर्वी सर्व लोकांनी आपापला पोषाख बदलून अहरामचा (पांढऱ्या कापडाचे न शिवलेले दोन तुकडे ज्यांना पुरुष

हाजी हजच्या काळात शरीराचा खालील भाग झाकण्यासाठी गुंडाळतात. महिला हाजी डोके व केस सभोवती पांढरा रूमाल बांधतात त्याला 'अहराम' म्हणतात.) फकीरासमान पोषाख परिधान करावा, जेणेकरून सर्व श्रीमंत व गरीब एकसमान व्हावेत, वेगवेगळ्या जाती-जमातीतील भेदभाव नष्ट व्हावा आणि सर्वांनी अल्लाहच्या दरबारात एक होऊन, फकीर बनून विनम्र भावे हजर व्हावे. (मीक़ात– मक्केतील एक जागा जेथे हाजी लोक हज करण्याची प्रतिज्ञा करतात व अहराम बांधतात.)

एकच घोषणा – मी हजर आहे

"मी हजर आहे, माझ्या अल्लाह, मी हजर आहे, हजर आहे मी, तुझा कोणीही भागीदार नाही, मी हजर आहे, निश्चितपणे सर्व स्तुति तुझ्यासाठीच आहे. सर्व तुझीच देणगी आहे, सर्व बादशाही तुझी आहे, तुझा कोणीही भागीदार नाही."

अशाच पवित्र, शुद्ध, निःस्वार्थ व विशुद्ध हजसंबंधी पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांनी फर्माविले–

"ज्याने अल्लाहसाठी हज केला आणि यात कामवासना व दुराचारापासून जो अलिप्त राहिला तर तो अशाप्रकारे परतला जणु आजच आपल्या आईच्यापोटातून त्याने जन्म घेतला आहे."

हजच्या अनिवार्यतेचे महत्व

आता यापूर्वी की, मी आपणासमोर हजच्या लाभांचे वर्णन करावे हे सुद्धा सांगणे आवश्यक आहे की हे कर्तव्य कसे आहे. पवित्र कुरआनमध्ये महान अल्लाह फर्मावितो,–

"आणि लोकांवर अल्लाहचा अधिकार आहे की ज्याच्यात या घरापर्यंत येण्याचे सामर्थ्य असेल त्याने याचा हज करावा आणि ज्याने याचा इन्कार केला तर अल्लाह सर्व जगवासियांकडून बेपर्वा आहे."

- सूरह आले इम्रान : ९७

या आयतीत सामर्थ्य असूनदेखील हेतुपुरस्सर हज न करण्याला कुफ्र (नास्तिकता) या शब्दाने संबोधिले आहे आणि याचे स्पष्टीकरण पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांनी या दोन हदीसींत केले आहे.

"ज्या माणसापाशी शिदोरी व सवारी (वाहन) असेल की ज्यामुळे अल्लाहच्या घरापर्यंत (काबापर्यंत) तो पोचू शकेल आणि असे असूनदेखील त्याने हज केला नाही तर त्याचे अशा स्थितीत मरणे आणि यहूदी (ज्यू) व नस्रानी) (ख्रिश्चन) होऊन मरणे एकसमान आहे."

"ज्याला एखाद्या स्पष्ट आवश्यकतेने हजपासून रोखले नसले, किंवा एखाद्या अत्याचारी राजाने अथवा एखाद्या रोगाने त्याला मज्जाव केला नसेल आणि तरी सुद्धा त्याने हज केला नसेल व अशाच स्थितीत त्याला मृत्यु आला तर त्याला ही मोकळीक आहे की त्याने हवे तर यहूदी (ज्यू) होऊन मरावे किंवा नस्रानी (ख्रिश्चन) बनून."

आणि याचेच स्पष्टीकरण हजरत उमर (रजि.) यांनी केले–

"जे लोक जर शक्ती असूनदेखील हज करीत नाहीत, माझ्या मनात येते की त्यांच्यावर जिझिया (कर) लावावे, ते मुसलमान नाहीत, ते मुसलमान नाहीत."

महान अल्लाहच्या या आदेश व पैगंबर हजरत मुहम्मद (स.) व त्यांच्या खलीफांच्या या स्पष्टीकरणावरून आपणास कल्पना आली असेल की हा फर्ज (अनिवार्य गोष्ट, कर्तव्य) असा फर्ज नाही की इच्छा असेल तर अदा करावा व इच्छा नसेल तर टाळावा. हा तर असा फर्ज आहे की प्रत्येक मुसलमान ज्याच्याजवळ काबापर्यंत जाण्या-येण्याइतकी रक्कम असेल व हाता-पायाने तो धडधाकट असेल त्याने आयुष्यात एकदा अनिवार्यपणे हज अदा केले पाहिजे, मग तो जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात का असेना आणि त्याच्यावर आपल्या मुला-बाळांची व आपल्या व्यापार अथवा नोकरी वगैरेच्या कितीही जबाबदाऱ्या का असेनात. जे लोक सामर्थ्य असूनदेखील हजला जाण्याचे टाळत राहतात आणि हजारो कामांची कारणे दाखवून वर्षामागे वर्ष असेच घालवीत असतात त्यांनी आपल्या ईमानच्या (श्रद्धेच्या) जपणुकीची काळजी वाहिली पाहिजे. उरले ते लोक की ज्यांना कधी असा

विचार येत नाही की हज अदा करण्याच्या कर्तव्याची जबाबदारी सुद्धा त्यांच्यावर आहे, जगभरात प्रवास करीत ते फिरतात, युरोपच्या काब्याला येता जाता हिजाजच्या (अरबस्थानातील मक्का-मदीनाचा प्रदेश) समुद्र तटावरून सुद्धा त्यांची ये-जा होते की जेथून मक्का केवळ कांही तासांच्या अंतराचा प्रवास आहे आणि तरी सुद्धा हज अदा करण्याची इच्छा त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही, ते कदापि मुसलमान नाहीत. खोटे बोलतात जर ते स्वतःला मुसलमान म्हणतात आणि पवित्र कुरआनपासून अनभिज्ञ आहे तो जो त्यांना मुसलमान समजतो. त्यांच्या हृदयात जर मुसलमानांविषयी व्यथा होत असेल तर भले होवो, अल्लाहची आज्ञाधारकता व त्याच्या आदेशांवर ईमान ठेवण्याची भावना तर त्याच्या हृदयात कोणत्याही परिस्थितीत असत नाही.

हजचे फायदे

इस्लामी बंधुनो! पवित्र कुरआनमध्ये जेथे हे वर्णन आले आहे की महान अल्लाहने हजरत इब्राहीम (अ.) यांना हजसंबंधी सर्वांसाठी दवंडी देण्याची आज्ञा दिली होती तेथे या आज्ञेचे पहिले कारण असे सांगितले आहे की–

"जेणेकरून लोकांनी येथे येऊन पहावे की या हजमध्ये त्यांच्यासाठी कसले लाभ आहेत." *- सूरतुल हज : २८*

म्हणजे हा प्रवास करून या जागी गोळा होऊन त्यांनी आपल्या डोळ्यांनी पहावे हे त्यांच्याच लाभासाठी आहे आणि यात लपलेल्या लाभांची कल्पना तर त्याचवेळी येऊ शकते की जेव्हां माणसाने हे कार्य स्वतः करून पहावे.

हजरत इमाम अबू हनीफा (रह.) यांच्यासंबंधी म्हटले जाते की जोपर्यंत त्यांनी हज केला नव्हता तोपर्यंत याबाबतीत संभ्रम होता की इस्लामी उपासनांमध्ये कोणती उपासना सर्वश्रेष्ठ आहे. परंतु जेव्हां त्यांनी स्वतः हज यात्रा करून ते असंख्य लाभ पाहिले जे या उपासनेत लपलेले आहेत, तेव्हां अनायासे त्यांच्या तोंडून निघाले की निश्चितपणे हज सर्वश्रेष्ठ उपासना आहे.

आता मी आपणाला थोडक्या शब्दात याचे लाभ सांगतो.

हज-प्रवासाचे स्वरूप

जगातील लोक सामान्यपणे दोन प्रकारच्या प्रवासाने परिचित आहेत. एक प्रवास तो जो रोजी कमविण्यासाठी केला जातो, दुसरा तो जो मौज-मजा व हिंडण्या-फिरण्यासाठी केला जातो. या दोन्ही प्रकारच्या प्रवासात आपली गरज व स्वतःची इच्छा माणसाला बाहेर पडण्यास भाग पाडते. जर मनुष्य घर सोडून बाहेर पडतो तर आपल्या गरजेसाठी, मुला-बाळांना व आप्तेष्ठांपासून दूर जातो तर आपल्यासाठी, संपत्ती अथवा वेळ खर्च करतो तर आपल्या हेतुसाठी, म्हणून यात त्यागाचा प्रश्नच येत नाही. परंतु हा प्रवास ज्याचे नाव हज आहे याचा मामला व प्रवास दुसऱ्या सर्व प्रवासापेक्षा भिन्न आहे. हा प्रवास आपल्या एखाद्या गरजेसाठी अथवा आपल्या मनातील इच्छेच्या तृप्तीसाठी नाही. तर हा प्रवास केवळ

अल्लाहसाठी आहे आणि ते कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आहे जे अल्लाहने ठरविलेले आहे. कोणताही मनुष्य या प्रवासाला तोपर्यंत तयार होऊ शकत नाही जोपर्यंत त्याच्या मनात अल्लाहचे प्रेम उत्पन्न होत नाही, त्याचे भय उत्पन्न होत नाही आणि त्याने ठरविलेल्या कर्तव्याला कर्तव्य समजण्याचा मनात विचार येत नाही. जो मनुष्य आपले घरदार सोडून एका दीर्घ मुदतीपर्यंत दूर राहणे, आपल्या आप्तेष्ठांचा वियोग, आपल्या व्यापार धंद्यातील खोट, आपल्या पैशांचा खर्च आणि प्रवासाचा त्रास सहन करून हजसाठी निघतो. त्याचे निघणे खुद्द या गोष्टीचे प्रमाण आहे की त्याच्या मनात अल्लाहचे भय व अल्लाहचे प्रेम सुद्धा आहे आणि कर्तव्याची जाणीव अशी शक्ती सुद्धा आहे की जर एखादेवेळी अल्लाहच्या मार्गात निघण्याची गरज भासली तर तो निघू शकतो, त्रास सहन करू शकतो, आपली संपत्ती व आपल्या सुख-शांतीचा अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी त्यागदेखील करू शकतो.

पुण्य-कार्य व ईशभीरूतेची आवड

मग जेव्हां तो अशा पवित्र विचाराने प्रेरित होऊन प्रवासासाठी तयार होतो तेव्हां त्याची मनःस्थिती कांही वेगळीच बनते. ज्या हृदयात अल्लाहच्या प्रेमाचा अग्नि भडकतो आणि ज्याला त्याच्या प्रेमाचा ध्यास लागतो त्या हृदयात मग केवळ पुण्याचे विचार घोळू लागतात. तो पापाचे प्रायश्चित्त करतो आणि लोकांकडे आपल्या पापाची क्षमा-याचना करतो. एखाद्याचा हक्क देणे बाकी असेल तर तो अदा करण्याची काळजी घेतो, जेणेकरून त्याने अल्लाहच्या दरबारात दासांच्या अधिकारांचा भार लादून घेऊन जाऊ नये. दुराचाराबद्दल त्याच्या मनात तिटकारा निर्माण होतो आणि नैसर्गिकरित्या कल्याण कार्याबद्दल आवड निर्माण होते. मग प्रवासासाठी निघाल्याबरोबर जितका जितका तो अल्लाहच्या घराकडे पुढे चालत जाईल तितकीच पुण्याची भावना त्याच्या मनात वाढत जाते. त्याचा प्रयत्न असा असतो की कोणालाही त्याच्याकडून त्रास होऊ नये आणि ज्याची जितकी सेवा अथवा मदत करता येईल तितकी ती करावी. अपशब्द व असभ्यता, निर्लज्जपणा, अप्रामाणिकता व भांडण-तंटे करण्यास त्याचे स्वतःचे मन त्याला अडविते कारण तो अल्लाहच्या मार्गात जात आहे. अल्लाहच्या घराकडे जाणारा प्रवासी असावा आणि त्याने वाईट कृत्ये करीत जावे, असे लज्जेचे कृत्य कोणाकडून कसे होईल? त्याचा हा प्रवास तर

संपूर्णपणे उपासना आहे. या उपासनेच्या स्थितीत अत्याचार व दुष्कृत्याला काय स्थान? म्हणून अन्य प्रवासांच्या विपरीत हा असा प्रवास आहे जो नेहमी माणसाच्या मनाला शुद्ध करीत राहतो आणि असे समजा की हा एक मोठा सुधारणा अभ्यासक्रम आहे जो अनिवार्यपणे त्या प्रत्येक मुसलमानाला पूर्ण करावा लागतो जो हजला जातो.

अहराम व त्याच्या अटी

प्रवासाचा एक टप्पा पूर्ण केल्यानंतर एक विशिष्ट सीमा अशी येते की जेथून कोणताही मक्केला जाणारा मुसलमान अहराम बांधल्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. हा अहराम आहे तरी काय? एक फकीरासमान पोषाख, ज्यात एक लुंगी, एक चादर व पादत्राणाशिवाय अन्य कांही नसते. याचा अर्थ असा आहे की आजतागायत तुम्ही जे कांही होता ते होता, परंतु आता जेव्हां तुम्हाला अल्लाहच्या दरबारात हजर व्हावयाचे आहे तर फकीर बनून हजर व्हा. बाहेरूनही फकीर बना व आतूनही फकीर बनण्याचा प्रयत्न करा. रंगीत वस्त्र व दिखाऊ पोषाख उतरा. साधा व फकीरी पद्धतीचा पोषाख धारण करा. मोजे घालू नका. डोके उघडे ठेवा, सुगंध व अत्तर वगैरे लावू नका, केस सुशोभित करू नका, सर्व प्रकारच्या शोभेपासून दूर रहा. स्त्री-पुरुष संबंध बंद करा, एवढेच नव्हे तर कामवासनेच्या कृति, लक्षणे व इशारे आणि असे बोलणे करू नका की ज्यामुळे असा विचार किंवा त्याची आठवण यावी. शिकार करू नका. एवढेच नव्हे तर शिकार करणाऱ्याला शिकारीचे चिन्ह व पत्ता सांगण्यापासूनही दूर रहा. जर बाह्यतः तुम्ही असे रूप धारण केले तर त्याचा अंतर्मनावरदेखील प्रभाव पडेल. आतूनदेखील तुमचे मन फकीर बनेल, मोठेपणा व गर्व नाहीसा होईल, दीनता व शांतिप्रियता मनात बसेल. जग व त्यातील आकर्षणात गुरफटल्यामुळे जी कांही घाण तुमच्या आत्म्याला लागली होती ती स्वच्छ होईल आणि ईश्वरभक्तीची भावना तुमच्यावर व आंतही आच्छादित होईल.

तलबियाह

अहराम बांधल्याबरोबर जी वचने हाजीच्या तोंडातून निघतात, जी तो प्रत्येक नमाजनंतर, प्रत्येक उंचीवर चढताना, प्रत्येक उतारावरून उतरताना, प्रत्येक

काफिल्याला भेटताना व दररोज सकाळी झोपेतून उठून मोठ्या आवाजात उच्चारतो ती अशी आहेत–

"मी हजर आहे, माझ्या अल्लाह! मी हजर आहे, हजर आहे. तुझा कोणीही भागीदार नाही, मी हजर आहे, निश्चितपणे सर्व प्रशंसा तुझ्यासाठीच आहे, देणगी सर्व तुझीच आहे आणि संपूर्ण बादशाही तुझी आहे. तुझा कोणीही भागीदार नाही."

हे मूलतः हजच्या त्या आम घोषणेचे उत्तर आहे जी साडेचार हजार वर्षांपूर्वी हजरत इब्राहीम (अ.) यांनी अल्लाहच्या आज्ञेने केली होती. पंचेचाळीस शतके लोटली जेव्हां प्रथमतः अल्लाहच्या त्या दवंडीने पुकारले होते की,– *"अल्लाहच्या दासांनो, अल्लाहच्या घराकडे या, पृथ्वीच्या प्रत्येक कोपऱ्यातून या, मग पायी या किंवा वाहनावर या."* त्याच्या उत्तरादाखल आजपर्यंत पवित्र काब्याकडे येणारा प्रत्येक प्रवासी उच्च स्वरात म्हणत आहे,– *"मी हजर आहे, माझ्या अल्लाह मी हजर आहे. तुझा कोणी भागीदार नाही, मी केवळ तुझ्या बोलावण्यावर हजर झालो आहे, स्तुति तुझ्यासाठी आहे, देणगी तुझी आहे, देश तुझा आहे, कोणत्याही गोष्टीत तुझा कोणी भागीदार नाही."* अशाप्रकारे प्रत्येक 'लब्बैक'च्या प्रत्येक ध्वनीबरोबर हाजीचा संबंध खऱ्या व केवळ अल्लाहच्या भक्तीच्या त्या चळवळीशी जुडतो जी हजरत इब्राहीम (अ.) व हजरत इस्माईल (अ.) यांच्या काळापासून चालत आली आहे. साडेचार हजार वर्षांचे अंतर मधून दर होते. असे वाटू लागते की जणु अल्लाहकडून हजरत इब्राहीम (अ.) तिकडे ब.लावीत आहेत आणि इकडून हा उत्तर देत आहे. उत्तर देत जातो आणि पुढे चालत जातो. जसजसा पुढे जातो, त्याची आवड अधिकाधिक तीव्र होत जाते. प्रत्येक चढण व उतारावर त्याच्या कानात अल्लाहच्या दवंडीचा आवाज घुमतो व हा त्यावर *"लब्बैक"* म्हणत पुढे जातो. प्रत्येक काफिला त्याला तेथीलच संदेशवाहक वाटतो आणि एखाद्या प्रियकरासमान त्याचा संदेश ऐकून प्रतिसाद देतो, *"मी हजर, मी हजर."* प्रत्येक नवीन प्रभात त्याला जणु मित्राचा संदेश आणते. आणि प्रकाशाच्या प्रभात काळी डोळे उघडताच हा "लब्बैका अल्लाहुम्मा लब्बैका"चा ध्वनि आळवू लागतो. सारांश असा की, हा वारंवार उठणारा ध्वनि तो फकीरासमान पोषाख, प्रवासाची ती स्थिती व मजल दर मजल काब्याच्या जवळ जवळ जाण्याच्या या

प्रक्रियेशी एकरूप होऊन कांही असले वातावरण निर्माण होते की हाजी अल्लाहच्या प्रेमात स्वतःला विसरून जातो आणि त्याच्या हृदयाची स्थिती अशी बनते की केवळ एका मित्राच्या स्मरणाशिवाय सर्व गोष्टींचे त्याला विस्मरण होऊन जाते.

दर्शनाची प्रदक्षिणा

अशा थाटात हाजी मक्का येथे पोचतो आणि जाताक्षणीच त्या उंबरठ्याकडे वळतो ज्याकडे त्याला बोलाविले होते. मित्राच्या उंबरठ्याचे चुंबन घेतो. मग आपल्या श्रद्धा, आपल्या ईमान, आपल्या धर्माच्या केंद्राभोवती प्रदक्षिणा घालतो आणि प्रत्येक प्रदक्षिणेचा प्रारंभ उंबरठ्याच्या (हज्रे अस्वद- काब्यातील काळा दगड) चुंबनाने व अंतदेखील त्या चुंबनानेच करतो. ('हज्रे अस्वद'च्या चुंबनावर अज्ञानी लोक बहुतेक आक्षेप घेतात. ते म्हणतात, की हीदेखील एक प्रकारची मूर्तिपूजाच होय. वास्तविकतः मुळात हे उंबरठ्याच्या चुंबनाशिवाय अन्य कांही नाही. काबागृहाची प्रदक्षिणा हज्रे अस्वदच्या समोरून सुरू केली जाते आणि सात प्रदक्षिणांच्या दरम्यान प्रत्येक प्रदक्षिणेच्या शेवटी हज्रे अस्वदचे चुंबन घेतले जाते अथवा त्याच्याकडे इशारा (संकेत) केला जातो. यात कणभरदेखील शंका त्या काळ्या दगडाच्या उपासनेची नाही. हजरत उमर (रजि.) यांचे हे कथन प्रसिद्ध आहे की, त्यांनी हज्रे अस्वदला उद्देशून सांगितले होते, "मला माहीत आहे की तू केवळ एक दगड आहेस. जर पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांनी तुझे चुंबन घेतले नसते तर मी कदापि तुझे चुंबन घेतले नसते.") यानंतर मकामे इब्राहीम (अ.) या ठिकाणी दोन रकअत अभिवादनाची नमाज अदा करतो, मग तेथून निघून सफा पर्वतावर चढतो आणि तेथून जेव्हां काबावर दृष्टि पडते तेव्हां तो पुकारतो,–

"कोणीही उपास्य नाही अल्लाहशिवाय, कुणा दुसऱ्याची आम्ही गुलामी करीत नाही. आमची आज्ञाधारकता केवळ अल्लाहसाठी विशिष्ट आहे, मग काफिरांना (अनेकेश्वरवाद्यांना) कितीही असह्य का होईना."

सफा व मर्बह दरम्यान धावणे

मग तो सफा व मर्बहच्या दरम्यान धावतो, जणु अशा वागण्याने या गोष्टीचे प्रमाण देतो की अशाचप्रकारे आपल्या स्वामीच्या सेवेत व अशाचप्रकारे त्याच्या

प्रसन्नतेसाठी तो सदैव प्रयत्नशील राहील. या 'सई'च्या (धावण्याच्या) दरम्यान त्याच्या मुखातून असे निघते–

"हे अल्लाह! माझ्याकडून काम घे त्याच पद्धतीने जी तुझ्या पैगंबरांची पद्धत आहे. आणि मला मृत्यु दे त्याच मार्गावर जो तुझ्या पैगंबरांचा मार्ग आहे आणि जीवनात मला वाचव त्या उपद्रवापासून जे सरळ मार्गावरून भटकविणारे आहेत."

आणि कधी म्हणतो–

"हे पालनकर्त्या! माफ कर आणि दया कर, माझ्या ज्या चुकांना तू जाणतोस, त्यांची क्षमा कर, तुझे सामर्थ्य सर्वांपेक्षा अधिक आहे आणि तुझी कृपा सुद्धा सर्वांपेक्षा अधिक आहे."

मिना, अरफ़ात व मुज़दल्फा येथील मुक्काम

यानंतर तो जणु अल्लाहचा शिपाई बनतो आणि आता त्याला पाच-सहा दिवसांपर्यंत शिबिरासारखे (कॅम्पसारखे) जीवन जगावे लागते. एक दिवस मिनामध्ये पडाव आहे, दुसऱ्या दिवशी अरफातमध्ये कॅम्प आहे आणि प्रवचनात (खुतब्यात) सेनापतीचे आदेश ऐकले जात आहेत. रात्री मुजदल्फा येथे छावणी घातली जाते.

रमी जिमार (शैतानला खडे मारणे)

दिवस उगवल्यावर मिनाकडे कूच केली जाते आणि तेथे त्या स्तंभावर खड्यांचा वर्षाव केला जातो जेथपर्यंत 'असहाबे फ़ील'ची (यमन देशाचा राजा अब्रहा बिन सबाहचे सैन्य जे हत्तीवर बसून मक्का व काबाचा विध्वंस करण्यासाठी आले होते. अल्लाहकडून त्यांना शिक्षा मिळाली.) सेना काबा ध्वस्त करण्यासाठी पोचली होती. प्रत्येक खडा मारल्याबरोबर अल्लाहचा शिपाई उच्चारतो–

"अल्लाहु अकबर ज़ग़मल्लिश्शैतानि व हिज़बिही."

आणि

"अल्लाहुम्मा तस्दीकन बिकिताबिका व इत्तिबाअल्लिसुन्नति नबिय्यिका."

खड्यांच्या या वर्षावाचा अर्थ असा आहे की,– *"हे अल्लाह जो तुझा धर्म*

मिटविण्याचा व तुझे नाव खालावण्याचा प्रयत्न करील, मी त्याच्या विरोधात तुझी कीर्ति-पताका उंचावण्याकरिता असा लढेन." मग त्याच ठिकाणी कुर्बानी (प्राण्याचा बळी) केली जाते, जेणेकरून अल्लाहच्या मार्गात रक्त वाहविण्याची मनीषा व निर्धार प्रत्यक्ष कृतीत यावा. मग तेथून काब्याकडे अशाप्रकारे वळले जाते जसा एखादा शिपाई आपली ड्युटी पूर्ण करून व यशस्वी होऊन हेडक्वार्टरकडे परततो. प्रदक्षिणा करून व दोन रकअत नमाज अदा करून झाल्यावर अहराम उघडले जाते. जे कांही निषिद्ध केले गेले होते ते आता पुन्हा 'हलाल' (धर्मसम्मत) ठरते आणि आता हाजीचे जीवन पुन्हा पूर्वपदावर येते. या सामान्य जीवनाकडे परतल्यावर हाजी मिनामध्ये जाऊन पुन्हा मुक्काम करतो आणि दुसऱ्या दिवशी त्या तीन स्तंभावर पाळीपाळीने पुन्हा खडे मारतो, ज्यांना 'जमरात' असे म्हणतात, जी वास्तविकतः त्या हत्तीच्या सेनेच्या पराजय व विनाशाची आठवण आहे. जी पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांच्या जन्मवर्षी ऐन हजच्या प्रसंगी अल्लाहचे घर पाडण्यासाठी फौज आली होती आणि ज्या फौजेला अल्लाहच्या आज्ञेने आकाशातील चिमण्यांनी खडे मारत-मारत नष्ट केले होते. (सामान्यतः असे प्रसिद्ध आहे की खडे मारण्याची ही कृति त्या घटनेच्या स्मरणार्थ केली जाते जी हजरत इब्राहीम (अ.) यांच्या बाबतीत घडली होती. ती अशी की जेव्हां हजरत इस्माईल (अ.) यांचा बळी देतेवेळी शैतानने येऊन त्यांना बहकविले होते आणि त्यांनी त्याला खडे मारले होते अथवा जेव्हां हजरत इस्माईल (अ.) यांच्या बदली बळी देण्यासाठी हजरत इब्राहीम (अ.) यांना मेंढा दिला गेला तेव्हां शैतान भिऊन पळाला होता आणि त्याला त्यांनी खडे मारले होते. परंतु कोणत्याही सही (बिनचूक) हदीसमध्ये पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांचे कथन नाही की खडे मारण्याचे हे कारण आहे.) तिसऱ्या दिवशी पुन्हा या स्तंभावर खड्यांचा वर्षाव केल्यानंतर हाजी मक्क्याला परत येतो आणि सात वेळा आपल्या धर्माच्या केंद्राला (काब्याला) प्रदक्षिणा (तवाफ) घालतो. ही निरोप घेण्याची प्रदक्षिणा होय. आणि ही प्रदक्षिणा पुरी झाली म्हणजे हज यात्रा पूर्ण झाली.

हजमधील सौभाग्य व तिचा प्रभाव

हा संपूर्ण तपशील जो आपण ऐकला त्यावरून आपण कल्पना करू शकता

की हजची इच्छा व त्या यात्रेच्या तयारीपासून आपल्या घरी परत येईपर्यंतच्या मुदतीत किती मोठा प्रभाव माणसाच्या मनावर व बुद्धीवर पडतो. यात वेळ खर्च होतो, संपत्ती खर्च होते, सुख-शांतीचा त्याग आहे, जगातील अनेक संबंधांचा त्याग करावा लागतो, अनेक कामवासनेच्या भावना व आवडींचा त्याग करावा लागतो. हे सर्वकांही अल्लाहसाठी करावे लागते. कोणताही वैयक्तिक स्वार्थ यात असत नाही. या शिवाय या प्रवासात भक्ती व ईशभीरूता अवलंबून निरंतर अल्लाहचे स्मरण करणे व अल्लाहविषयी प्रेम व आवडीच्या स्थितीचा प्रभाव मानवी मनावर असा कांही पडतो की तो आपली एक कायमस्वरूपी छाप मनावर सोडतो की जिचा प्रभाव वर्षानुवर्षे टिकून राहतो. याशिवाय हरमच्या भूमीवर पोचताच माणूस पावलोपावली त्या लोकांवरील प्रभाव पाहतो ज्यांनी अल्लाहची गुलामी व आज्ञाधारकतेत सर्वस्वाचा त्याग केला आहे. अनेकांशी ते लढले, आपत्ती सहन केल्या, देशत्याग केला, एकापाठोपाठ अत्याचार सहन केले, परंतु सरतेशेवटी अल्लाहचे नाव उंचावून सोडले आणि त्या प्रत्येक खोट्या शक्तीचा निःपात केला जी मानवाला अल्लाहला सोडून इतर कोणाची गुलामी करण्यास भाग पाडू इच्छित होती. या उघड आयात आणि या पवित्र प्रभावांना पाहून एक अल्लाहचा भक्त निर्धार, धैर्य व अल्लाहच्या मार्गात जिहाद (धर्मयुद्ध) करण्याचा जो धडा घेऊ शकतो, कदाचित कोणत्याही दुसऱ्या गोष्टीपासून घेऊ शकत नाही. या शिवाय काब्याच्या भोवती प्रदक्षिणा घातल्याने या धर्माच्या केंद्राशी जो संबंध प्रस्थापित होतो आणि हजच्या विधि उरकण्यात जी धावपळ, कूच करणे व मुक्काम करणे वगैरेंमुळे धर्मयोद्ध्याप्रमाणे जीवनाचा जो सराव करविला जातो त्याला जर आपण नमाज, उपवास (रोजे) व जकात या त्रयीशी जोडून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की या सर्व गोष्टी एखाद्या फार मोठ्या कार्याचे प्रशिक्षण आहे जो इस्लाम मुसलमानांना देऊ इच्छितो. म्हणूनच त्या प्रत्येक मुसलमानास, जो काबापर्यंत जाण्या-येण्याचे सामर्थ्य बाळगतो, हज अनिवार्य केले गेले आहे जेणेकरून प्रत्येक काळात शक्यतो जास्तीत जास्त असे मुसलमान उपस्थित रहावेत ज्यांनी हे पूर्ण प्रशिक्षण घेतलेले असावे.

हज एक सामूहिक उपासना

परंतु जोपर्यंत आपल्या डोळ्यांसमोर ही गोष्ट नसेल की एकटा-एकटा

मुसलमान पृथक-पृथक हज करीत नाही तोपर्यंत हजच्या लाभांची पूर्ण कल्पना करण्यास तुम्ही असमर्थ ठराल. संपूर्ण जगातील मुसलमानांसाठी हजचा एकच काळ निश्चित केलेला आहे आणि हजारो लाखो मुसलमान मिळून एकाच वेळी हज अदा करतात. यापूर्वी जे कांही मी सांगितले आहे त्यावरून तर आपल्याला केवळ हीच गोष्ट स्पष्ट झाली असेल की व्यक्तिशः प्रत्येक हाजीवर या उपासनेचा काय प्रभाव पडतो. आता मी पुढील प्रवचनात आपल्याला हे सांगेन की जगभरातील मुसलमानांसाठी हजचा एकच काळ निश्चित करून या लाभांना कसे लाखो पटीने वाढविले आहे. इस्लामची कमाल अशी आहे की तो एकाच वेळी दोन कार्य नव्हे तर हजार कार्ये सिद्धीस नेतो. नमाज एक एकट्याने वेगळी वेगळी अदा करण्यात कांही कमी लाभ नव्हते, परंतु नमाजबरोबर जमाअतची अट लाऊन व इमामतचा (नेतृत्वाचा) कायदा लागू करून, आणि जुमुआह व दोन ईदच्या मोठ्या जमाअती बनवून तिच्या लाभांना बेहद्द वाढविले आहे. रोजा (उपवास) व्यक्तिशः ठेवणे सुद्धा सुधारणा व प्रशिक्षणाचे फार मोठे साधन होते, पण सर्व मुसलमानांसाठी रमजानचा एकच महीना निश्चित करून त्याचे लाभ इतके वाढविले आहेत की त्यांची गणना करणे अशक्य आहे. जकात पृथक-पृथक देण्यात सुद्धा अनेक सद्गुण होते, तथापि त्याच्याकरिता 'बैतुल माल'ची (सार्वजनिक कार्यासाठी असलेला खजिना) योजना करून त्याच्या लाभांना इतके वृद्धिंगत केले आहे की आपण त्याची कल्पना तोपर्यंत करू शकत नाही जोपर्यंत इस्लामी राज्याची स्थापना होत नाही. आणि आपण स्वतःच्या डोळ्यांनी हे पाहत नाही की तमाम मुसलमानांची जकात एकाच केंद्रावर गोळा करून एका विशिष्ट व्यवस्थेच्या अधीन गरजू व हक्कदार लोकांना वाटप केल्यास किती भरभराट व मांगल्य येते. हीच गोष्ट हजची सुद्धा आहे. एकट्या एकट्या माणसाने जरी हज केले तरी सुद्धा त्याच्या जीवनात फार मोठी क्रांति येऊ शकते. परंतु संपूर्ण जगातील मुसलमानांसाठी एकच वेळ ठरवून देऊन एकत्रितपणे हज करण्याचा कायदा लागू करून तर त्या यात्रेच्या लाभांची कोणतीच सीमा उरली नाही. या विषयासाठी थोड्या तपशीलाची आवश्यकता आहे म्हणून जर अल्लाहने इच्छिले तर आगामी प्रवचनात त्याचा तपशीलवार उहापोह करू शकेन.

हजचे जगव्यापी सम्मेलन

हजची फळे

इस्लामी जगतात चळवळ

इस्लामी बंधुनो! आपल्याला ज्ञात आहे की असले मुसलमान ज्यांच्यावर हज अनिवार्य आहे म्हणजे जे काबापर्यंत येण्या-जाण्याचे सामर्थ्य बाळगतात, एक-दोन तर असत नाहीत. प्रत्येक गावात त्यांची संख्या लक्षणीय असते. प्रत्येक शहरात हजारो व प्रत्येक देशात लाखो तर असतातच. प्रत्येक वर्षी त्यांच्यापैकी बरेच लोक हजचा निश्चय करून निघतात. आता थोडी कल्पना करा की जगाच्या कानाकोपऱ्यांत जेथे जेथे मुसलमान आहेत, हजचा काळ आल्याबरोबर तेथे इस्लामचे जीवन कशाप्रकारे जागृत होते, कशी गति येते व ती किती वेळ टिकून राहते. जवळजवळ रमजानच्या महिन्यापासून (इस्लामी नववा महीना) जिल्काद (अकरावा महिना) पर्यंत जगाच्या निरनिराळया भागातून निरनिराळे लोक हजची तयारी करून निघतात. आणि जिल्हजच्या (इस्लामी बारावा महीना) अखेरपासून सफर (इस्लामी दुसरा महीना) रबीउल अव्वल (तिसरा महीना) नव्हे तर रबीउस्सानी (इस्लामी चौथा महीना) पर्यंत परतीच्या प्रवासाचा क्रम चालूच राहतो. या सहा-सात महिन्यांच्या मुदतीपर्यंत जणु अखंडपणे संपूर्ण पृथ्वीतलावरील मुसलमान वस्तीत एक प्रकारची धार्मिक चळवळ सुरू राहते. जे लोक हजला जातात व हजने परत येतात ते तर धार्मिक भावनेत भरून असतातच, पण जे गेले नाहीत त्यांना सुद्धा, हाजी लोकांना निरोप देण्यात व एक-एक वस्तीतून त्यांच्या जाण्यामुळे आणि पुन्हा परत आल्यावर त्यांचे स्वागत केल्यामुळे व त्यांच्याकडून हजमधील प्रसंग ऐकल्यामुळे, कमी-जास्त प्रमाणात त्या स्थितीचा कांही न कांही भाग प्राप्त होतो.

भक्ती व ईशभीरूतेत वृद्धी

जेव्हां प्रत्येक हाजी हजचा निश्चय करतो आणि या निश्चयाबरोबरच त्याच्यावर अल्लाहचे भय व भक्ती, क्षमा-याचना व पश्चात्ताप आणि सदाचाराचा प्रभाव होऊ लागतो आणि तो आपल्या आप्तेष्ठ, मित्र, व्यवहार असलेले लोक

आणि संबंधी मंडळींचा अशाप्रकारे निरोप घेऊ लागतो व आपले व्यवहार पूर्ण करू लागतो, जणु हा तसा पहिल्यासारखा मनुष्य राहिला नाही, तर अल्लाहची ओढ लागल्यामुळे त्याचे हृदय स्वच्छ व पवित्र होऊ लागले आहे. यावरून कल्पना करा की हाजींच्या या स्थितीचा किती लोकांवर परिणाम होत असेल आणि समजा की प्रत्येक वर्षी जगाच्या विविध भागांतून एक लक्ष लोक जरी सरासरी अशाप्रकारे हजसाठी तयार होत असतील तर त्यांचा प्रभाव किती लाख लोकांच्या चारित्र्यावर पडत असेल? शिवाय हाजी लोकांचे काफिले जेथून जेथून जात असतील तेथे त्यांना पाहून व भेटून आणि त्यांचा 'लब्बैक-लब्बैक'चा ध्वनि ऐकून किती लोकांची हृदये उद्वेलित होत असतील? किती लोकांचे लक्ष अल्लाह व त्याच्या घराकडे आकर्षित होत असेल? आणि किती लोकांच्या सुप्त आत्म्यात हजची लालसा उत्पन्न झाल्यामुळे जागृति निर्माण होत असेल? मग जेव्हां हे हाजी लोक आपल्या केंद्रातून भक्तीभावनेने परिपूर्ण होऊन आपापल्या गावांना जगातील विविध भागांत हजच्या आनंदाचा कैफ घेऊन परतत असतील आणि स्थानिक लोक त्यांना भेटत असतील तेव्हां त्यांच्या तोंडून हजचा अहवाल व अल्लाहच्या काबागृहाचे वर्णन ऐकून असंख्य अशा कितीतरी लोकांच्या मनातील धार्मिक भावनांमध्ये पुन्हा ताजेपणा येत असेल.

इस्लामी जगताच्या जागृतीचा मोसम

म्हणून जर मी असे म्हटले तर अयोग्य होणार नाही की ज्याप्रमाणे रमजानचा महीना संपूर्ण इस्लामी विश्वात संयम व सदाचाराचा मोसम आहे त्याचप्रमाणे हजचा काळ संपूर्ण पृथ्वीतलावर इस्लामच्या जिवंतपणाचा व जागृतीचा काळ आहे. अशा तऱ्हेने शरीअत (इस्लामी कायदा) बनविणाऱ्या विवेकी व बुद्धिवानने (अल्लाहने) अशी अनुपम व्यवस्था करून ठेवली आहे की अल्लाहने इच्छिले तर कियामत (अंतिम दिन) पर्यंत इस्लामची ही जगव्यापी चळवळ बंद पडू शकणार नाही, मग जगाची स्थिती कितीही बिघडेना किंवा काळ कितीही वाईट येईना, तरीपण हे काब्याचे केंद्र इस्लामी विश्वाच्या शरीरात कांही अशाप्रकारे स्थापित केले आहे जसे माणसाच्या शरीरात हृदय असते. जोपर्यंत हालचाल चळवळ सुरू असेल तोपर्यंत मनुष्य मरू शकत नाही. मग त्याला आजारपणामुळे हलण्याची सुद्धा शक्ती का नसेना. अगदी त्याचप्रमाणे जगाचे हे हृदय सुद्धा प्रत्येक वर्षी

त्याच्या लांब लांबच्या नाड्यांमधून सुद्धा रक्त ओढून घेत असते आणि मग ते प्रत्येक नाडीपर्यंत पसरविते. जोपर्यंत या हृदयाची हालचाल सुरू आहे आणि जोपर्यंत रक्त ओढणे व त्याच्या प्रसरणाची प्रक्रिया सुरू आहे तोपर्यंत हे अत्यंत कठीण आहे की या शरीराचे जीवन संपुष्टात यावे, मग आजारपणामुळे ते कितीही क्षीण व जर्जर का होईना.

मुस्लिम एकतेचे उल्हासपूर्ण दृश्य

जरा डोळे बंद करून आपल्या मनात त्या दृश्याची कल्पना तरी करा की, पूर्वेकडून, दक्षिणेकडून, पश्चिमेकडून, उत्तरेकडून अगणित जातींचे व असंख्य देशांचे लोक हजारो मार्गाने एकाच केंद्राकडे येतात. चेहरे-मोहरे वेगवेगळे आहेत, विभिन्न रंग आहेत, भाषा तऱ्हेतऱ्हेच्या आहेत; परंतु केंद्रापाशी एका निश्चित हद्दीपर्यंत पोचताक्षणी सर्व आपापल्या देशाचे पोषाख उतरतात आणि सर्वजण एकाच प्रकारचा साधा गणवेष परिधान करतात. अहरामचा हा गणवेष घातल्यानंतर हे स्पष्टपणे कळते की विश्वाचा बादशाह व पृथ्वी आणि आकाशाच्या बादशाहची ही फौज, जी जगातील हजारो जमातीतून भरती होऊन येते, एकाच बादशाहची फौज आहे, एकाच्याच आज्ञाधारकता व गुलामीची छाप त्या सर्वांवर लागलेली आहे. एकाच्याच एकनिष्ठतेच्या बंधनात हे सर्व बांधलेले आहेत, आणि एकाच राजधानीकडे आपल्या बादशाहच्या सेवेत हजर होण्यासाठी ते जात आहेत. हे गणवेषधारी शिपाई जेव्हां 'मीकात'च्या (अहराम बांधण्याची जागा) पुढे चालू लागतात तेव्हां त्या सर्वांच्या तोंडातून एकच घोषणा निघते–

"लब्बैक, अल्लाहुम्मा लब्बैक, लाशरीका लका लब्बैक"

सर्वांच्या बोलण्याच्या भाषा वेगवेगळया आहेत, परंतु घोषणा मात्र सर्वांची एकच आहे. मग जेव्हां केंद्र जवळ जवळ येत जाते, तेव्हां परीघ अधिकाधिक आकुंचित होत जातो, विविध देशांचे काफिले मिसळत जातात आणि सर्वचजण मिळून एकाच प्रकारे नमाज अदा करतात. सर्वांचा एकच युनिफॉर्म (गणवेष), सर्वांचा एकच इमाम (नेता), सर्वांची एकच क्रिया, सर्वांची एकच भाषा, सर्वजण एकाच *"अल्लाहु अकबर"*च्या इशाऱ्यावर उठतात व बसतात, आणि 'रूकुअ' व 'सिजदे' करतात आणि सर्वजण त्याच पवित्र कुरआनचे पठन व श्रवण करतात.

अशा तऱ्हेने भाषा, राष्ट्रीयता, जन्मभूमि व वंशाचे भेद नाहीसे होतात आणि अशाप्रकारे अल्लाहच्या भक्तांची एक विश्वव्यापी जमाअत बनते. मग जेव्हां हे काफिले एकमुखाने ***"लब्बैक-लब्बैक"***च्या घोषणा देत चालतात, जेव्हां प्रत्येक चढण व प्रत्येक उतारावर हीच घोषणा, काफिल्यांच्या भेटप्रसंगी हीच घोषणा, नमाजांच्या वेळी आणि भल्या पहाटे याच ध्वनीचे गुंजन होते तेव्हां एक अजब वातावरण निर्माण होते, ज्याच्या नशेत मनुष्य धुंद होऊन आपल्या स्वतःला विसरून जातो आणि या "**लब्बैक**"च्या वातावरणात निमग्न होतो. मग काब्याला पोचल्यावर संपूर्ण जगातून आलेल्या लोकांचे एकाच पोषाखात एकाच केंद्रीभोवती प्रदक्षिणा घालणे, मग सर्वांचे एकाच वेळी 'सफा' व 'मर्वह'च्या दरम्यान धावणे, सर्वांचे मिनामध्ये शिबीर लावणे, मग सर्वांचे अरफातकडे कूच करणे, आणि एकाच इमामकडून प्रवचन ऐकणे, नंतर मुजदल्फा येथे रात्री छावणी घालणे, मिना येथे सर्वांचे परतणे, मग सर्वांनी एकत्र येऊन 'जुम्रा-ए-उकबा'वर खडे मारणे, मग सर्वांचे कुर्बानी (प्राणी बळी देणे) देणे, मग सर्वांचे एकाच वेळी काब्याकडे परत येऊन प्रदक्षिणा घालणे आणि सर्वांचे एकाच केंद्रासभोवती नमाज अदा करणे; खुद्द या सर्व गोष्टीत एक प्रकारची अशी तल्लीनतेची स्थिती लपलेली आहे की जिचे उदाहरण जगात आढळत नाही.

एकच उद्देश, एकाच केंद्रावर सम्मेलन

जगभरातील देशांतून व जातींतून निघालेल्या लोकांचे एकाच केंद्रावर सम्मेलन आणि तेही एकदिलाने व मतैक्याने, अशा सहमतीने व एकवाक्यतेने, अशा पवित्र भावना, पवित्र उद्देश व पवित्र कर्मासह, वास्तविकतः एक अशी महान देणगी आहे जी आदमच्या संततीला इस्लामशिवाय इतर कुणी दिलेली नाही. जगातील जाती सदैव एकमेकाला भेटत राहिल्या आहेत, पण कशाप्रकारे? युद्धभूमीत गळे कापण्यासाठी, किंवा तहाच्या बैठकीत, देशांच्या विभाजनासाठी व जातींच्या वाटणीसाठी किंवा संयुक्त राष्ट्राच्या (युनोच्या) परिषदेत, जेणेकरून प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या विरूद्ध फसवेगिरी, धोकेबाजी, कट-कारस्थान व अप्रामाणिकतेचे जाळे पसरावे व दुसऱ्यांच्या नुकसानाने आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करावा. सर्व राष्ट्रांच्या सामान्य लोकांचे स्वच्छ मनाने एकमेकाशी

भेटणे, सदाचार व पवित्र विचाराने भेटणे, प्रेम व निष्कपटतेने भेटणे, हार्दिक व आत्मिक ऐक्याने भेटणे, विचार, कर्मे व उद्देशांच्या एकरूपतेने भेटणे आणि केवळ एकदाच भेटून न राहणे तर वरचेवर प्रत्येक वर्षी एका केंद्रावर अशाच प्रकारे एकत्रित होत राहणे, काय अशी देणगी इस्लामशिवाय मानवजातीला इतरत्र कोठे मिळू शकेल? जगात शांति प्रस्थापित करण्यासाठी, राष्ट्रांचे शत्रुत्व संपुष्टात आणण्यासाठी आणि भांडण-तंट्याऐवजी प्रेम, मित्रत्व, बंधुत्वाचे वातावरण निर्माण करण्यासाठी यापेक्षा श्रेष्ठ औषधयोजना अद्याप कुणी केली आहे काय?

शांति-प्रस्थापनेसाठी सर्वात मोठी चळवळ

इस्लाग केवळ इतकेच करीत नाही तर यापेक्षा अधिक येथे बरेच कांही आहे. इस्लामने हे अनिवार्य ठरविले आहे की वर्षाचे जे चार महिने हज व उमराहसाठी निश्चित केले आहेत त्या काळात असा प्रयत्न केला जावा की काब्याकडे येणाऱ्या सर्व मार्गांवर शांतता नांदावी. ही जगात शांतता टिकवून ठेवण्याची सर्वात मोठी चिरःकालीन चळवळ आहे. आणि जर जगाच्या राजकारणाची लगाम इस्लामच्या हातात असेल तर मुसलमानांचा हरप्रकारे असा प्रयत्न राहील की जगात अशी अशांतता पसरू नये की ज्यामुळे हज व उमरहची व्यवस्था खंडित व्हावी.

जगातील एकमेव शांति-केंद्र

इस्लामने जगाला एक असा हरम (मक्का०मदीनेचा परिसर) दिला आहे जो 'कियामत'पर्यंत (अंतिम दिनापर्यंत) शांतीचे शहर आहे, ज्यात मनुष्य तर सोडाच कोणत्याही प्राण्याची शिकार केली जाऊ शकत नाही, तेथे गवत सुद्धा कापण्याची परवानगी नाही. त्या भूमीवरील काटादेखील तोडला जाऊ शकत नाही. एखाद्याची एखादी वस्तु पडलेली असेल तर कोणी दुसऱ्याने तिला हात लावण्याची परवानगी तेथे नाही.

इस्लामने जगाला एक असले शहर दिले आहे ज्यात हत्यारे आणण्याची परवानगी नाही. तेथे धान्य व दुसऱ्या सामान्य जीवनावश्यक वस्तूंचा साठा करून त्या महाग करणे हे कृत्य 'इलहाद' (नास्तिकता) च्या सीमेपर्यंत पोचते. अशा प्रकारचा जुलुम करणाऱ्याला अल्लाहने धमकी दिली आहे की—

"आम्ही त्याला करूणाजनक शिक्षा देऊ."

खऱ्या समानतेचे केंद्र

इस्लामने जगाला एक असले केंद्र दिले आहे ज्याची प्रशंसा या शब्दांत केली जाऊ शकते.

"तेथे त्या सर्व लोकांचे अधिकार अगदी समान आहेत जे अल्लाहची बादशाही व हजरत मुहम्मद (स.) यांचे मार्गदर्शन स्वीकारून इस्लामच्या भाऊकीत प्रविष्ट होतील." - *सूरतुल हज : २५*

मग एखादा मनुष्य अमेरिकेचा निवासी असो की आफ्रिकेचा, चीनचा असो अथवा हिंदुस्तानचा; जर तो मुसलमान झाला तर मक्केच्या भूमीवर त्याचे तेच अधिकार आहेत जे खुद्द मक्कावासी लोकांचे आहेत. पूर्ण हरमच्या प्रदेशाचा दर्जा तसाच आहे जसा एखाद्या मसजिदचा असतो, जर एखाद्या माणसाने मसजिदमध्ये प्रवेश केला व तो एखाद्या मोकळया जागी स्थानापन्न झाला तर ती विशिष्ट जागा त्याची आहे, कोणी त्याला तेथून उठवू शकत नाही, त्याला त्या जागेचे भाडेही मागू शकत नाही. परंतु जर त्या जागी तो आयुष्यभर बसला तरी त्याला असे म्हणण्याचा अधिकार नाही की ही जागा माझ्या मालकीची आहे. तो ती जागा विकूही शकत नाही की त्या जागेचे भाडेही वसूल करू शकत नाही, येथपावेतो की जेव्हां तो मनुष्य त्या जागेवरून उठेल तेव्हां त्या जागी दुसऱ्याला बसण्याचा तसाच अधिकार आहे जसा की पहिल्या मनुष्याला होता. बस्स, अशीच स्थिती संपूर्ण मक्केच्या हरम प्रदेशाची आहे.

पेगंबर हजरत मुहम्मद (स.) यांचे कथन आहे की,–

"जो मनुष्य या शहरात येऊन एखाद्या जागी प्रथम उतरेल ती जागा त्याचीच आहे."

तेथील घरांचे भाडे घेणे अनुचित आहे.

हजरत उमर (रजि.) यांनी तेथील लोकांना आज्ञा दिली होती की आपल्या घरांच्या सभोवतालच्या आवाराला दारे लावू नका जेणेकरून हवे त्याने तुमच्या अंगणात येऊन थांबू शकावे. कांही धर्मशास्त्र तज्ञांनी तर येथपर्यंत सांगितले आहे

की मक्का शहरातील घरावर कोणाचाही मालकी हक्क नाही व ती घरे वारशाने कोणालाही दिली जाऊ शकत नाहीत. इस्लामशिवाय या देणग्या माणसाला कोठे अन्यत्र मिळू शकतील काय?

बंधुनो, ही आहे ती हज यात्रा जिच्यासंबंधी फर्माविले गेले होते की हज करून पहा की त्यात तुमच्यासाठी किती लाभ आहेत. माझ्या वाणीत इतके सामर्थ्य नाही की मी त्या सर्व लाभांची मोजदाद करावी. तथापि हजपासून होणाऱ्या लाभांची जी ही लहानशी रूपरेषा मी आपल्यासमोर प्रस्तुत केली आहे त्यावरूनच आपण त्या हजच्या वास्तविकतेची कल्पना करू शकता.

आमची गुणग्राहकहीनता

परंतु हे सर्व कांही ऐकल्यानंतर जरा माझ्या दग्ध हृदयातील कांही गोष्टी सुद्धा ऐकून घ्या. मुसलमानांच्या वंशात जन्मलेल्या तुम्हा लोकांची स्थिती त्या बाळाप्रमाणे आहे की ज्याचा जन्म हिऱ्याच्या खाणीत झालेला आहे. हे बाळ जेव्हां चोहीकडे हिरेच हिरे पाहतो तेव्हां तो दगडांच्या खड्यांप्रमाणे हिऱ्याशी खेळतो आणि त्याच्या दृष्टीने हिरे तसेच मूल्यहीन असतात जसे दगडाचे खडे. हीच अवस्था तुमची सुद्धा आहे की जग ज्या देणग्यांपासून वंचित आहे, ज्यापासून वंचित होऊन जगातील अन्य लोक अनेक आपत्ती व त्रासांना तोंड देत आहेत आणि त्या देणग्यांच्या शोधात उद्विग्न व त्रस्त आहेत, त्या देणग्या तुम्हाला फुकटात कोणत्याही परिश्रमाविना व शोधाविना केवळ या कारणामुळे प्राप्त झाल्या आहेत की सुदैवाने तुमचा जन्म मुसलमान परिवारात झाला आहे. तो 'कल्मा-ए-तौहीद' (अल्लाह एकच असल्याबद्दलची ग्वाही) जो माणसाच्या जीवनाच्या सर्व जटिल समस्यांची सोडवणूक करून एक स्वच्छ सरळ मार्ग बनवितो तो बाल्यावस्थेपासून तुमच्या कानात पडला आहे. नमाज व रोजे (उपवास) यांच्या रसायनांपेक्षा अधिक मौल्यवान औषधयोजना जी माणसाला पशुपासून मनुष्य बनविते आणि माणसाला अल्लाहचे भय बाळगणारा आणि एकमेकाचा बंधु, सहानुभूति बाळगणारा आणि मित्र बनविण्यासाठी ज्यांच्यापेक्षा श्रेष्ठतर औषधयोजनेचा आजपर्यंत शोध लागलेला नाही, ती तुम्हाला डोळे उघडताक्षणी आपोआप बापजाद्यांचा वारसा म्हणून मिळाली आहे. जकातची ती अनुपम योजना की ज्यामुळे केवळ मनाचीच अपवित्रता नाहीशी

होते असे नव्हे तर जगाची आर्थिक व्यवस्थादेखील सरळ होते. या व्यवस्थेपासून वंचित होऊन तुम्ही स्वतः आपल्या डोळ्याने पाहत आहात की जगातील लोक कसे एक दुसऱ्याचे तोंड ओरबडू लागले आहेत. ती व्यवस्था तुम्हाला अशाप्रकारे प्राप्त झाली आहे जशी एखाद्या निपुण हकीमच्या (वैद्याच्या) मुलाला विना परिश्रम विना मेहनतीने ती औषधयोजना प्राप्त होते जिच्या शोधार्थ इतर मंडळी वणवण फिरत असतात. अशाचप्रकारे हजची ती वैभवशाली पद्धत आहे की जिच्या प्रभावाचे उदाहरण जगभरात कोठेही आढळत नाही. यापेक्षा अधिक शक्तीशाली मार्ग कोणत्याही चळवळीला संपूर्ण विश्वात तिचा प्रसार करण्यासाठी व ती चिरःकाल टिकविण्यासाठी सापडलेला नाही. त्या पद्धतीशिवाय आज जगात कोणतीही अशी विश्वव्यापी शक्ती अस्तित्वात नाही की जी आदम (अ.) यांच्या संततीला (मानवांना) पृथ्वीच्या कानाकोपऱ्यातून आकर्षित करून एक अल्लाहच्या नावाने एका केंद्रावर गोळा करू शकेल आणि तिने असंख्य वंशांना व जातींना एका अल्लाहचे उपासक, धर्मनिष्ठ, हितचिंतक भावकीत जोडावे. होय, अशी अनुपम पद्धतदेखील कोणतीही शोधाशोध न करता ऐती तयार आणि शेकडो वर्षांपासून चालत आलेली तुम्हाला प्राप्त झाली. परंतु तुम्ही या देणग्यांची कांहीही कदर केली नाही कारण डोळे उघडताच ही तुम्हाला आपल्या घरांत बसून हाती आली. आता तुम्ही त्यांच्याशी अगदी तशाच प्रकारे खेळीत आहात ज्याप्रकारे हिऱ्याच्या खाणीत जन्मणारा तो अबोध बालक हिऱ्याशी खेळतो आणि त्यांना दगड-खडे समजू लागतो. आपल्या निरक्षरपणा व अज्ञानामुळे ज्या वाईट तऱ्हेने तुम्ही ही प्रचंड दौलत व शक्ती वाया घालवीत आहात ते पाहून हृदयात आग लागल्याशिवाय राहत नाही. कोणी कोठून इतकी सहनशीलता आणावी की दगडफोड्या वडाराच्या हाताने हिऱ्यांचा विध्वंस होताना पहावे आणि मूग गिळून गप्प बसावे?

माझ्या मित्रानो, तुम्ही कोणा शायर (कवि) चा हा शेर (दोन काव्यपंक्ती) तर ऐकलाच असाल की,–

ख़रे ईसा अगर बमक्का ख़द।
चूँ बिआयद हनूज़ ख़र बाशद।।

अर्थातै– हजरत ईसा (अ.) यांच्यासारख्या महान पैगंबरांचा गाढव जरी मक्क्याला

गेला तरी तो त्याचा कोणताही लाभ उचलू शकत नाही. जर तो मक्क्याहून परतला तर त्याच्यात कांहीही फरक पडणार नाही, तो गाढवचा गाढवच राहील.

नमाज, रोजा असो की हज, या सर्व गोष्टी समंजस लोकांच्या प्रशिक्षणासाठी आहेत. ज्या लोकांना त्यांचा अर्थ कळत नाही, त्यांचा उद्देश काय आहे याची गरज नाही, त्यांचे लाभ उचलण्याची इच्छा नाही की जे लाभ या उपासनेत निहित आहेत. ज्या लोकांच्या डोक्यात या उपासनांच्या उद्देश व अर्थाची कल्पना मुळातच नसेल तर त्यांनी जर या कृतींची नक्कल करावयाचे ठरविने आणि जी कृति पुढील लोकांना करताना पाहिले आणि तसे केले तर शेवटी अशाने कोणत्या परिणामाची अपेक्षा केली जाऊ शकते? दुर्दैवाने सामान्यतः हल्लीचे मुसलमान याच पद्धतीने या कृति करीत आहेत. प्रत्येक उपासनेचे बाह्य रूप जसे ठरवून दिले गेले आहे ते तसेच करतात, परंतु त्या स्वरूपात आत्मा आढळत नाही. तुम्ही पाहता की प्रत्येक वर्षी हजारो दर्शनार्थी इस्लामच्या केंद्राला (काब्याला) जातात आणि हजने सन्मानित होऊन परततात, परंतु जातानाही त्यांची तशी स्थिती दिसत नाही जशी हरमच्या (काब्याच्या) प्रवाशाची असणे आवश्यक आहे आणि तेथून परतल्यानंतरदेखील त्यांच्यावर हजचा कोणताही परिणाम दिसून येत नाही. या प्रवासात ते त्या वस्तींच्या मुस्लिम व मुस्लिमेतर लोकांवर आपल्या सदाचाराची छाप टाकीत नाहीत की जेथून ते जातात. या उलट त्यांच्यात बहुतेक लोक असे आहेत जे आपल्या घाणेरडेपणा, अशिष्टपणा व नैतिक पतनाचे प्रदर्शन करून इस्लामच्या प्रतिष्ठेला बट्टा लावतात. त्यांचे जीवन पाहून इस्लामच्या श्रेष्ठत्वाची छाप मुस्लिमेतरावर बसण्याऐवजी खुद्द मुसलमानांच्या दृष्टीत सुद्धा ते प्रतिष्ठाहीन बनतात आणि हेच कारण आहे की आज खुद्द आमच्या स्वतःच्या जातीचे अनेक तरुण आम्हाला विचारतात की जरा या हजचे फायदे तरी आम्हाला समजावून सांगा. वस्तुतः हज यात्रा ती गोष्ट होती की जर ती तिच्या मूळ वैभवाने अदा केली गेली असती तर काफिरांनी सुद्धा तिचे लाभ पाहून जाहिरपणे ईमान आणले असते. एखाद्या चळवळीच्या हजारो लाखो सदस्यांनी प्रत्येक वर्षी जगाच्या प्रत्येक भागातून आकर्षित होऊन एके ठिकाणी जमा व्हावे आणि मग आपापल्या देशात त्यांनी परत जावे, देशादेशातून शहराशहरातून जाताना आपल्या पवित्र जीवन, पवित्र विचार व पवित्र आचरणाचा त्यांनी परीचय देत जावे, जेथे जेथे थांबतील आणि जेथून जातील तेथे आपल्या

चळवळीच्या तत्त्वांचा त्यांनी केवळ तोंडी प्रचारच करू नये तर आपल्या व्यावहारिक जीवनात त्यांची अम्मलबजावणी करून दाखवावे आणि हा क्रम दहावीस वर्षेच नव्हे तर अनेक शतकांपर्यंत प्रत्येक वर्षी चालत रहावा. थोडा विचार करा की खरोखर असे घडले असते तर हजचे लाभ काय आहेत असे विचारण्याची पाळी आली असती काय? अल्लाहची शपथ, जर हे कार्य योग्य प्रकारे झाले असते तर आंधळ्यालादेखील याचे फायदे दिसले असते आणि बहिऱ्यांनी याचे लाभ ऐकले असते. हजारो मुस्लिमेतरांना इस्लामच्या छत्रछायेत आणले असते आणि लक्षावधी मुस्लिमेतरांच्या मनावर इस्लामच्या श्रेष्ठत्वाची छाप पडली असती. परंतु वाईट होवो अज्ञानाचे. अडाण्यांच्या हाती पडल्यामुळे किती मौल्यवान वस्तु कशा वाईट प्रकारे वाया जात आहे?

हजचे पूर्ण लाभ घेण्याची पद्धत

हजचे सर्व लाभ प्राप्त होण्यासाठी हे आवश्यक होते की इस्लामच्या केंद्रात एखादा असा हात असता की ज्याने या विश्वव्यापी शक्तीचा उपयोग केला असता, एखादे हृदय असे असते की जे प्रत्येक वर्षी जगाच्या शरीरात सत्प्रवृत्त रक्त प्रवाहित करीत राहिले असते, एखादे मेंदू असे असते की ज्याने या हजारो-लाखो अल्लाहने पाठविलेल्या संदेशवाहकांच्या माध्यमाने जगभरात इस्लामचा संदेश प्रसारित करण्याचा प्रयत्न केला असता. आणखी कांही नाही तर कमीत कमी इतके तरी झाले असते की तेथे निव्वळ इस्लामी जीवनाचा एक परिपूर्ण नमुना अस्तित्वात असता आणि प्रत्येक वर्षी जगाचे मुसलमान तेथून अचूक धार्मिकतेचा ताजा धडा घेऊन परतले असते. परंतु अरेरे, तेथे कांहीही नाही. दीर्घ काळापासून अरबस्थानात अज्ञान पल्लवित होत आहे. अब्बासी युगापासून उस्मानी युगापर्यंत प्रत्येक काळातील बादशाह आपल्या राजकीय स्वार्थासाठी अरबस्थानची प्रगति करण्याऐवजी त्याला शतकानुशतके निरंतर अधोगतिकडे नेण्याचा प्रयत्न करीत राहिले आहेत. त्यांनी अरबस्थानवासियांना, ज्ञान, सदाचार, संस्कृति, हरप्रकारे पतनाच्या अंतिम सीमेपर्यंत आणून सोडले आहे. त्याचा परिणाम असा आहे की ती भूमि की जेथून एके काळी इस्लामचा प्रकाश संपूर्ण विश्वात पसरला होता, आज त्याच अज्ञान युगापर्यंत येऊन ठेपली आहे ज्यात ती भूमि इस्लामपूर्वी गुरफटलेली

होती. आज तेथे इस्लामचे ज्ञान नाही, इस्लामी सदाचार नाही व इस्लामी जीवनदेखील नाही. लोक लांब लांबून मोठ्या श्रद्धा घेऊन पवित्र हरमचा प्रवास करतात. परंतु या प्रदेशात पोचल्यावर जेव्हां त्यांना सर्वत्र अज्ञान, घाण, लालसा, निर्लज्जता, ऐहिकता (जगावर प्रेम), दुराचार, अव्यवस्था आणि सामान्य नागरिकांप्रमाणे हरप्रकारे खालावलेली स्थिती दृष्टीस पडते, तेव्हां त्यांचा अपेक्षा-भंग होतो, त्यांचे स्वप्न भंगते. येथपावेतो की बरेचसे लोक हज करून आपला ईमान (अल्लाहवरील विश्वास) वाढविण्याऐवजी उलट कांही तरी गमवून येतात. तीच प्राचीन महंतगिरी, जी हजरत इब्राहीम (अ.) व इस्माईल (अ.) नंतर अज्ञान युगात काब्यावर प्रभावी झाली होती आणि जिला पैगंबर हजरत मुहम्मद (स.) यांनी समाप्त केले होते, आता पुनरुज्जीवित झाली आहे. हरमे काबाचे (काब्याचे परिसर) व्यवस्थापक पुन्हा तसेच महंत बनून बसले आहेत. अल्लाहचे घर त्यांच्यासाठी संपत्ती व हज त्यांच्यासाठी व्यापार बनलेले आहे. हज करणाऱ्यांना ते आपला 'असामी' (ग्राहक, ज्याला फसवावयाचे आहे तो मनुष्य) समजतात. विविध देशात गलेलठ्ठ पगार प्राप्त करणारे एजंट नेमलेले आहेत जेणेकरून त्यांनी असामींना घेऊन पाठवावे. प्रत्येक वर्षी अजमेरच्या सेवकाप्रमाणे दलाल व प्रवास एजंटांचे एक मोठे लष्कर मक्क्याहून निघते जेणेकरून जगभरातील देशातून त्यांनी असामींना घेरून आणावे. पवित्र कुरआनच्या आयती व हदीसचे आदेश लोकांना ऐकवून ऐकवून हजसाठी तयार करावे, अशासाठी नव्हे की त्यांना अल्लाहने अनिवार्य केलेल्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी, तर केवळ अशासाठी की त्यांनी हे आदेश ऐकून हजसाठी निघावे व यांच्या कमाईचे द्वार उघडले जावे, जणु महान अल्लाह व त्याच्या पैगंबरांनी हा सारा उद्योग व खटाटोप याच महंतांच्या व त्यांच्या दलालांच्या पालन पोषणासाठी केला होता. याशिवाय जेव्हां हे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी मनुष्य घरातून निघतो तेव्हां प्रवास सुरू करण्यापासून ते घरी परत येईपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्याचा धार्मिक मजूर व धार्मिक व्यापाऱ्यांशी संबंध येतो. 'मुअल्लिम' (विधि वगैरेंचे शिक्षण देणारा), 'मुतव्विफ़' (प्रदक्षिणा प्रशिक्षक) मुतव्विफचा वकील, काब्याच्या किल्ल्यांचा रक्षक, आणि खुद्द अरबस्थान सरकार, सर्वजण या धंद्यात भागीदार आहेत. हजच्या सर्व विधि मोबदला घेऊनच अदा करविल्या जातात. एखाद्या मुसलमानांसाठी काबागृहाचा दरवाजा सुद्धा फी

घेतल्याविना उघडला जाऊ शकत नाही. काशी व हरिद्वाराच्या पंडितांप्रमाणे ही पद्धत त्या धर्माच्या नामधारी सेवकांनी व केंद्रीय उपासनागृहाच्या मुजावरांनी अवलंबिली आहे ज्या धर्माने महंतगिरीचा धंदा समूळ नष्ट केला होता. जेथे उपासनाविधि करविण्याचे कार्य मजुरी व व्यापार बनले असेल, जेथे उपासनास्थळांना अर्थार्जनाचे साधन बनविले की अल्लाहची आज्ञा ऐकून लोकांनी कर्तव्य बजावण्यासाठी बाध्य व्हावे आणि या शक्तीच्या बळावर लोकांचे खिशे मोकळे केले जावेत. जेथे भक्ताला उपासनेची प्रत्येक विधि पूर्ण करण्यासाठी पैसे मोजावे लागत असतील, आणि धार्मिक मांगल्य एक खरेदी व विक्रीची वस्तु बनलेली असेल, अशा ठिकाणी बरे उपासनेचा आत्मा कसा शिल्लक राहू शकेल? आपण कशी आशा करू शकता की हज करणाऱ्यांना व हज करविणाऱ्यांना या उपासनेचे खरे व आध्यात्मिक लाभ प्राप्त होतील की जेव्हां ही सर्व कर्मे व्यापार व दुसरीकडे खरेदीच्या मानसिकतेतून होत असतील? (लक्षात असावे की हे प्रवचन इसवी सन १९३८चे आहे. यानंतर आजपर्यंत परिस्थितीत बरीच सुधारणा झालेली आहे आणि सऊदी अरेबियाचे शासन अधिक सुधारणा करण्यास प्रयत्नशील आहे. अरबस्थानात शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. रियाद, मक्का, जद्दा वगैरे शहरात शरीअतच्या (इस्लामी कायद्याच्या) शिक्षणासाठी उच्च कोटीच्या संस्था स्थापन केल्या गेल्या आहेत. मदीना तय्यबामध्ये एक जामिया इस्लामिया (इस्लामी विद्यापीठ) या विश्वविद्यालयाने प्रचंड प्रमाणावर काम सुरू केले आहे. मक्का मुअज्जमा येथे राबिता-ए-इस्लामिया या नावाने इस्लामी विश्वाची एक आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना केली गेली आहे. जी पूर्णपणे प्रयत्न करीत आहे की, हजच्या सम्मेलनाचा लाभ घेऊन सर्व मुस्लिम राष्ट्रांत धार्मिक आत्मा जागृत केला जावा. या दृष्टीने स्थिती बरीचशी समाधानकारक आहे. आता दोन बाबींकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. एक अशी की हरमैन शरीफैनच्या भूमीला पाश्चिमात्य संस्कृतीच्या पुरापासून वाचविले जावे. दुसरी अशी की मुअल्लिमीन (हजच्या विधीचे मार्गदर्शक) याच्या कार्यपद्धतीत सुधारणा केली जावी. अल्लाहने सऊदी अरेबियाच्या राज्याला या बाबतीत योग्य उपाय करण्याची सद्‌बुद्धी द्यावी.)

याउल्लेखाने माझा हेतु कोणाला दोष देण्याचा नाही, तर केवळ तुम्हाला सांगावयाचे आहे की हजसारख्या महान शक्तीला आज कोणत्या गोष्टींनी जवळ

जवळ अगदी परिणामहीन बनवून टाकले आहे. हा गैरसमज कोणाच्या मनात असू नये की इस्लाममध्ये आणि त्याने सुरू केलेल्या पद्धतीतच एखादी उणीव आहे. नव्हे, उणीव तर मुळात त्या लोकांत आहे जे इस्लामचे योग्य प्रकारे अनुसरण करीत नाहीत. ही तुमची स्वतःच्या हाताची कमाई आहे की ज्या पद्धती तुम्हाला मानवतेचा परिपूर्ण नमुना बनविणार होत्या आणि त्यावर योग्यप्रकारे मार्गाक्रमण करून तुम्ही संपूर्ण जगाचे सुधारक व इमाम (नेते) बनू शकत होता, त्यांच्यापासून आज कोणतेही चांगले फळ प्रकट होत नाही आणि अशी पाळी आलेली आहे की लोकांना खुद्द या पद्धतीच लाभदायक असल्याबद्दल शंका वाटू लागली आहे. याचे उदाहरण अगदी असेच आहे जसे एखाद्या निपुण डॉक्टराने कांही रामबाण औषधांच्या औषध-योजना मृत्युसमयी लिहून ठेवल्या असाव्यात आणि नंतर त्या औषध-योजना अडाणी व अज्ञानी वंशजांच्या हाती लागून वाया जात असाव्यात व बदनाम सुद्धा होत असाव्यात. खुद्द औषध-योजना कितीही बरोबर असली तरी तिचा उपयोग करणाऱ्याला त्या कलेचे ज्ञान व माहिती असणे जरुरीचे आहे. अडाण्याने जर तिचा प्रयोग केला तर ती अनुपयुक्तच नव्हे तर हानिकारक सुद्धा सिद्ध होईल यात आश्चर्य वाटू नये. त्याचबरोबर अशा लोकांनी, की ज्यांची औषध-योजनेचे परीक्षण करण्याची पात्रता नाही, या चुकीच्या समजुतीत राहू नये की औषध-योजनाच मुळी चुकीची आहे.

आमची प्रकाशने

२५	ज. इ. हिं. उ. प्र. प्रतिबिंबित स्वरूपात	मर्कज जमाअते इस्लामी हिंद
२६	स. ना. का. वास्तवता व प्र.च्या उजेडात	मो. वहिदुद्दीन खान
२७	दयाभावना व मांसाहार	मो. फारुक खान
२८	एकेश्वरवाद व पैगंबरीचा तर्कसिद्ध पुरावा	सय्यद अबुल आला मौदूदी
२९	संपत्तीत अल्लाहचा वाटा	सय्यद जलालुद्दीन उमरी
३०	इस्लाम व मानवसमाज	एस. एम. इकबाल
३१	मानवतेचा आदर्श	मधुर संदेश
३२	मानवाचे मौलिक अधिकार	सय्यद अबुल आला मौदूदी
३३	इस्लाम आणि मानवजातीची एकता	सय्यद जलालुद्दीन उमरी
३४	एकेश्वरवाद म्हणजे काय ?	इनामुर्रहमान खान
३५	मधुर संदेश	डॉ. इल्तिफात अहमद
३६	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इस्लाम	आर. एस. विद्यार्थी
३७	जातीय दंगली आणि आपली जबाबदारी	इनआमुर्रहमान खान
३८	कुरआन आणि आधुनिक विज्ञान	डॉ. मॉरिस बुकैले
३९	स्त्री आणि इस्लाम	सय्यद जलालुद्दीन उमरी
४०	बहुपत्नित्व	सय्यद हामिद अली
४१	स्त्री आणि निसर्ग-नियम	सय्यद अबुल आला मौदूदी
४२	इस्लाम एक अध्ययन	डॉ. जमीला अली जाफरी
४३	इस्लाममध्ये मानव-अधिकार	स. अबुल आला मौदूदी
४४	इस्लाम ज्यावर माझे प्रेम आहे	वेंकटचलम अडियार
४५	परलोक व त्याचे पुरावे	सय्यद हामिद अली
४६	हजरत मुहम्मद (स.) यांचा आदर्श	श्री. नाथू राम
४७	मुहम्मद (स.) आदर्श प्रेषित	प्रा. के. एस. आर. राव
४८	परलोकाच्या छायेत	मुहम्मद फ़ारुक़ खान

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई.